गुरुवार, १३ एप्रिल २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 13 APRIL 2023
adhunikkesari.com Adhunik Kesari
● YEAR-02 ● ISSUE-220 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



# निवडणूक आयोगाचा 'दे धक्का आणि बुक्का'!





आधुनिक केसरी न्यूज

**भारतीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तृणमूल काँग्रेस व भारतीय कम्युनिस्ट पक्ष यानी तीन पक्षांचा राष्ट्रीय दर्जा काढून घेत जोरदार धक्का दिला आहे,तर या आयोगावर नित्य शिव्याची लाखोळी वाहणाऱ्या आम आदमी पक्षाला राष्ट्रीय दर्जा बहाल केला आहे,त्यामुळे या पक्षाच्या नेत्यांना गुलाल लावून आनंद व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे.आम आदमी राजकारणात पक्षाने तीन अनुभवी मोठ्या नेत्यांना मागे टाकले आहे.त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत मोदी विरोधात आम आदमीचे नेते केजरीवाल यांचा चेहरा असू शकतो!**



देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पध्दतीने मतदान घेण्याचे निवडणूक आयोगासमोर मोठे आव्हान होते.त्यावेळी मतदारांची संख्या १७ कोटी ३२ लाख १२ हजार ३४३ होती.तेंव्हा ८५ टक्के लोक निरक्षर होते.तेंव्हा मतदारांना उमेदवारांचे नाव वाचता सुध्दा येत नव्हते.तेंव्हा उमेदवारांच्या नावासमोर निवडणूक चिन्ह वापरण्याचा निर्णय घेतला गेला.त्यात अनेक पक्षांनी नांगर चिन्हाचा घेण्याचा आग्रह होता. तेंव्हा चिठ्ठी टाकून चिन्ह वाटपाचा निर्णय घेतला. त्यावेळी मतपत्रिकेचा वापर केला जात असे. मतदारांची संख्या १० कोटी ५४ होती. ४५.७ टक्के मतदान झाले.मतदान प्रक्रिया चार महिने चालली.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

देशाच्या निवडणूक आयोगाने मतदान, मोजणी प्रक्रिया, मतदारांना अश्या सुधारणा करत आलेला आहे.पण विरोधी पक्षांना निवडणूक पध्दतीत सुधारणा मान्य नाही,त्यामुळे मतपत्रिकेव्दारे मतदान करण्याचा आग्रह धरत आहेत.याचे नवल वाटते! नेते शरद पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत विरोधी पक्षाने व 'बसप'च्या नेत्या मायावतीने मतपत्रिकेव्दारे मतदान घेण्याची मागणी केली आहे.देशात१९५१-५२ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूक एकाचवेळी घेण्यात आली. १९६७ पर्यंत दोन्ही निवडणूका घेण्यात येत होत्या.आता देशात रोज निवडणूका व त्यावर होणार कोट्यवधी खर्च होतो आहे. विरोधी पक्ष एकत्रित निवडणूक घेण्यास विरोध करतो आहे. २०१४ च्या निवडणुकीत आयोगाचा खर्च ३ हजार कोटी होता.त्यात इतर खर्च वेगळा!उमेदवारांचा खर्च अब्जावधी रूपये आहे निवडणुकीत काळ्या पैश्याचा वापर मोठ्या प्रमाणात वापर होतो! त्यातून भ्रष्टाचार वाढतो! विरोधी पक्षाचे नेते निवडणूक खर्चाच्या कपातीची सूचना,प्रशासन व सुरक्षा व्यवस्थेवरील तणाव कमी करावा, याबाबत विधायक सूचना करत नाहीये!.देश आर्थिक खड्यात गेला तरी चालेल,अमचे भले झाले पाहिजे'अशी त्यांची मानसिकता झालेली आहे. आहे.पहिल्या लोकसभा निवडणुकीत ५३ पक्ष निवडणुकीत त्यात १४ राष्ट्रीय पक्ष होते.तेंव्हा शेड्यूल कास्ट पक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उभे होते.काँग्रेसने त्यांच्या विरोधात नारायण काजोलकर यांना उभे केले.

यात आंबेडकरांचा पराभव झालाआंबेडकर प्रेमींना मोठा धक्का बसला. काँग्रेस आज आंबेडकरांचे नाव घेत असले, तरी पक्षाने हयातीत त्यांचा सन्मान केलेला नाही.या पक्षाच्या नेतृत्वात 'ओठात एक पोटात एक असते.लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला.या पक्षाला ४४.९९ टक्के तर समाजवादी पक्षाला ४०.५४ टक्के मिळाली, तो दुसऱ्या क्रमांकावर होता.त्यानंतर भाकप,जनसंघ पक्ष हिंदु महासभा, किसान मजदूर आदी पक्ष काँग्रेसच्या विरोधात उतरले होते. आज देशाची लोकसंख्या १३४ कोटी आहे.तर साक्षरतेचे प्रमाण ७४.४ टक्के आहे.देशाचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना राजकीय पक्ष मतपत्रिका व चिन्हाचा आग्रह धरत आहेत,हेच दुर्देव आहे. देशात २०२१ नुसार नोंदणीकृत पक्षाची संख्या २८५८ त्यात ८ राष्ट्रीय पक्ष तर५४ राज्य पक्ष आहेत.अरिचित पक्षाची संख्या २७९६ इतकी आहे.राष्ट्रीय व राज्य पक्ष मान्यता मिळविण्यासाठी काही नियम आहेत. त्यात लोकसभेच्या वेगवेगळ्या राज्यातून दोन जागा जिंकणे बंधनकारक आहे.लोकसभा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही चार किंवा अधिक राज्यात ६ टक्के मते मिळणे व लोकसभेच्या चार जागा जिंकणे महत्वाचे आहे.तसेच चार राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता असणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त राष्ट्रीय दर्जा असलेल्यात राष्ट्रीय काँग्रेस ( स्थापना -१८८५) भारतीय कम्युनिस्ट पक्ष( १९२५) माकपा ( १९६४) तृणमूल काँग्रेस( १९९८) राष्ट्रवादी काँग्रेस (१९९९) भाजपा ( १९८०) बसपा (१९८४) नॅशनल पीपल्स पार्टी (२०१३) या ८ पक्षांचा समावेश होता.निवडणूक आयोग प्रत्येक लोकसभा निवडणुकीनंतर निकालावरुन पक्षांची मान्यताबाबत निर्णय घेत असते.


पण तो प्रलंबित होता! दोन लोकसभा व २१ राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालानंतर आयोगाने समीक्षा करूनच निर्णय घेतला.या निवडणुकीत भाकप,राष्ट्रवादी काँग्रेस,व तृणमूल काँग्रेस पक्षाला यश मिळाले नाही. तर आम आदमी पक्षाला मताची टक्केवारी वाढ झाल्याने राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला.तसेच लोकदल,भारत राष्ट्र समिती,पी.डीए.पीएनके, राष्ट्रीय समाज पार्टी ,एनपीसी आदी राज्यस्तरीय पक्षांचा दर्जा काढून घेतला गेला.यात ममता व पवार यांची राष्ट्रीय नेतृत्व करण्याची इच्छा होती ती धुळीला मिळालेली आहे.तृणमूलने आयोगाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली असून ते न्यायालयात याचिका दाखल करणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने अजून भूमिका स्पष्ट केलेली नाही.आता राष्ट्रीय पक्ष काँग्रेस व भाजपा,माकप,बसप,नॅशनल पीपल्स पार्टी,आम आदमी सहा पक्ष राहिले आहेत.यात राष्ट्रवादी काँग्रेस,तृणमूल काँग्रेस, बसपा हे पक्ष एका परिवाराचे पक्ष आहे.काँग्रेस पक्षाची सूत्रे एका घराण्याकडे आहेत. भाजपा, माकप,भाकपची सूत्रे एका परिवाराकडे नाही.तर आम आदमी पक्षाचे लगाम केजरीवालांच्या हातात आहे. तरीही हे पक्ष लोकशाहीवादी समजतात.पहाता !पहाता! राजकारणात अनुभवी पक्षाचे नेत्यांना मागे टाकले आहे. आम आदमी पक्षाला (स्थापना २०१२ ) राष्ट्रीय पक्षाला मान्यता मिळाली आहे.आजपर्यंत केजरीवाल निवडणूक आयोगावर शिव्या -शाप देत होते. त्यांनीच दिल्ली विधानसभेचे विशेष अधिवेशन घेवून 'ईव्हीएम' चे बटन दाबले की,भाजपाला मत पडते,याचे प्रात्यक्षिक दाखविले होते! मग पंजाबमध्ये काय चमत्कार झाला!मग हा इव्हीएम, चा चमत्कार नाही का? आम आदमीला दिल्ली गोवा,गुजरात,पंजाब राज्यात मते मिळाली,त्याआधारेच राष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या पक्षाचा नौटंकीपणा व खोटारडेपणा,भ्रष्ट नेते जेल मध्ये गेले, हा निकषाव हा दर्जा मिळालेला नाही. केजरीवाल यांना चमत्कार वाटतो आहे! 'उपरवाले की इच्छा है"आम्ही देशासाठी काही तरी करावे! असे म्हणाले आहेत.त्यात अजून घोटाळे करा! जेलमध्ये जा!असा संदेश त्यांनी दिला आहे.आम आदमी यांचे दोन दिल्ली व पंजाबमध्ये पक्षाचे सरकार आहे.लोकसभेत -एक तर राज्यसभेत-१० सदस्य आहेत. एकूण विधानसभा सदस्यात ४०३६ पैकी १६१ पक्षाचे सदस्य आहेत.बसापचे राज्यात सत्ता नाही,पण



लोकसभेत- १० तर राज्यसभेत१ सदस्य व विधानसभेत ७ सदस्य संख्या आहे. भाजपाची १४ राज्यात सत्ता व लोकसभेत ३०३ व राज्यसभेत ९३ व विधानसभेचे १४१५ सदस्य संख्या आहे. भाकप एका राज्यात सत्ता,तर लोकसभेत -३ व राज्यसभेत २ व विधानसभा सदस्य ८२ आहे. काँग्रेसची तीन राज्यात लोकसभेत ४९ राज्यसभेत ३१ व विधानसभा सदस्य ६७० इतकी आहे. तृणमूलचे लोकसभेतज्ञ२२ राज्यसभेत १३ आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस लोखसभेत ५ व राज्यसभेत ४ सदस्य आहेत. इतर पक्षाची सत्ता कोठेही नाही,तसेच लोकसभा व राज्यसभा सदस्य संख्या नगण्य आहे. आज भाजपाचे लोकसभा व राज्यसभेचे संख्याबळ अधिक आहे.केजरीवाल यांनी याबाबत मतदारांचे व निवडणूक आयोगाचे एका शब्दाने आभार मानलेले नाहीत या निमित्ताने भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जेल मध्ये असलेले सिसोदीया व जैन यांची आठवण येत आहे. केजरीवाल यांची पंतप्रधान होण्याची इच्छा लपून राहिलेली नाही.राष्ट्रीय पक्ष मान्यता मिळाल्यानंतर पक्षाला देशात कोठेही उमेदवार उभे करता येते,दिल्लीत पक्ष कार्यालयासाठी इमारत अथवा जागा उपलब्ध करून दिली जाते. पक्षाच्या प्रचारासाठी ४० स्टार प्रचारक प्रत्येक निवडणूक प्रचारासाठी पाठविण्याचा अधिकार मिळतो.दुरदर्शन व आकाशवाणीवर पक्षासाठी निर्धारित वेळ दिला जातो.आता २०२३ राज्यातील सात विधानसभा निवडणूका होणार आहेत,आता कर्नाटक विधानसभेची निवडणूक लागली आहे. त्यानंतर राजस्थान, मध्यप्रदेश, तेलंगणा व जम्मू -काश्मीर, छत्तीसगड ,मिझोरामची निवडणूका महत्वाचे ठरणार आहेत. आता निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला कायमचा नाही. तो बदलू शकतो. मतदारांनी राजकीय पक्षांच्या बाजूने चांगली पंसती मते दिली तरच तीन पक्षांना दर्जा रद्द झाला आहे तो पुन्हा मिळू शकतो! तर आम आदमी पक्षाची राष्ट्रीय पक्षाचा दर्जा जाऊही शकतो! तेंव्हा फारसे उत्साही होऊ नका! या आनंदावर विरजन पडेल! याची काळजी घ्या! देशातील राजकारणाचा इतिहास वाचा! कित्येक पक्ष जन्मले व लयाला गेले आहेत.आज राष्ट्रीय काँग्रेसची काय अवस्था आहे.

आता गांधी परिवार भारतातील लोकशाही वाचविण्याचा सल्ला संदेश देत आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षाचे व नेत्याचे भवितव्य मतदारांच्या हातात आहे. ते कधी डोक्यावर घेतील! ते कधी उखडून टाकतील,याचा नेम नाही!



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन

आधुनिक केसरी

संसारातील दैन्य, दुःख, अडचणी यांचा वीट येऊन विरक्ती येणे वेगळे आणि सर्व सुखे हात जोडून उभी असताना विरक्ती प्राप्त होणे यात जमीन अस्मानाचा फरक आहे. म्हणूनच गौतमाने केलेला सर्व सुखांचा त्याग आगळावेगळा ठरतो.

बुद्धांच्या चरित्रात आपण बऱ्याच ठिकाणी वाचतो की त्यांनी कपिलवस्तू नगरीत फिरताना एक वृद्ध व्यक्ती, एक अत्यंत दुर्धर रोगाने पीडित असलेली व्यक्ती, एका मरण पावलेल्या व्यक्तीची अंत्ययात्रा आणि एक जीवनातील दुःखांना कंटाळून संन्यास स्वीकारलेली अशी एक व्यक्ती असे चार दुःखद प्रसंग पाहिले. आणि जीवनातील दुःखाची त्यांना कल्पना आली. बऱ्याच ठिकाणी हे चार प्रसंग एकत्र दाखवले आहेत पण या सगळ्या दुःखद गोष्टी त्यांना एकत्रच आणि एकाच वेळी दिसल्या असतील असे म्हणता येत नाही. पण काही असले आणि त्या गोष्टी कोणत्याही क्रमाने दिसल्या असल्या तरी त्यातून त्यांची मुळातच विरक्त असलेली वृत्ती आणि मानवी जीवनातील सुख दुःखाचा शोध घेण्याची भावना अधिक तीव्र झाली असावी हे नक्की. छन्न नावाचा त्यांचा सारथी होता. पण ज्याच्याशी मोकळेपणाने बोलता येईल असा मित्रही तो होता. त्याच्याबरोबर नगरात फिरताना विविध विषयांवर त्यांची चर्चा होत असे. छन्न याचे गौतमावर विशेष प्रेम होते. त्यामुळे त्याच्या विरक्तीच्या गोष्टी ऐकून तो प्रसंगी दुःखीही होई. पण कोणत्याही परिस्थितीत आपल्या मित्राची साथ द्यायची असेच त्याने ठरवले होते. सिद्धार्थ उर्फ गौतमाला अशा प्रकारे एका बाजूला विरक्ती आली असताना नियती त्याला सांसारिक बंधनात अडकवून जणू त्याची परीक्षा घेत होती. याच सुमारास यशोधरेने एका गोड आणि सुकुमार मुलाला जन्म दिला. शुद्धोधन राजाला आनंद झाला. आता तरी गौतमाची विरक्ती जाऊन त्याला संसाराची आसक्ती निर्माण होईल असे त्याला वाटले. सिद्धार्थाच्या जन्माच्या वेळी ज्योतिषांनी सांगितलेली भविष्यवाणी त्याच्या कानात वारंवार निनादत होती. 'हा मुलगा सर्व सुखांचा त्याग करून एक तर बुद्ध तरी होईल किंवा तसे न झाल्यास तो चक्रवर्ती सम्राट तरी होईल' अशी ती भविष्यवाणी होती. शुद्धोधन राजाच्या मनात दुसऱ्या शक्यतेची आशा पालवली होती.



## आनंदी पहाट

## तुझे माझे करण्यामुळे वितुष्ट निर्माण होते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कौटुंबिक कलहांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे होत असल्याचे अनेकदा समजते. विवाहानंतर उभयतांनी मिळवलेले आपापले उत्पन्न हे स्वतःसाठीसुद्धा न वापरता जोडीदाराने मिळवलेल्या पैशावर हक्क दाखवायचा, त्यांतूनच खर्च करायचा आणि स्वकमाईतून मिळालेला पैसा शिल्लक ठेवायचा. ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केवळ पैशाचीच गरज भासू लागते. स्व; अर्थ नाही तर परम अर्थ हीच भावना रुजणे तापदायक, घातक ठरू शकते, ही जाणीव होणे आवश्यक असते. आर्थिक पातळीवर माझे ते माझेच आहे, पण तुझे सुद्धा माझेच आहे, असा विचार करणारी व्यक्ती मानसिक पातळीवर मात्र तुझे-माझे करून मोकळे होताना दिसते. एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो. अनेकदा नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहारामुळे परस्परांमध्ये दुरावा निर्माण होत जातो, गैरसमज वाढत जातात, मतभेद व्हायला लागतात आणि कालांतराने परस्परांविषयी वैरभावना निर्माण होऊ लागते. ह्यामुळे घडत काहीच नाही परंतू सर्वच पातळीवर बिघडायला लागते. परस्परांच्या भावनांबद्दल नेहमी संवेदनशील राहणे आवश्यक असते. एखादी व्यक्तिगत मागणी पूर्ण झाली नसेल तर नाराज होण्यापेक्षा त्यामागचे कारण समजून घ्यावे, दुसऱ्याची बाजू देखील लक्षांत घेणे आवश्यक असते. काहीवेळा गैरसमजांमुळे अविश्वास निर्माण होत राहतो आणि जोडीदार आपली फसवणूक करतोय असे हळूहळू

वाटायला लागते, ते अधिक घातक असते. या नात्यामध्ये कायम गोडवा रहावा असे कोणाला वाटत नाही ? असे जरी असले तरी, काहीवेळा हे संबंध बिघडण्याची परिस्थिती निर्माण होते.



आधुनिक केसरी

**फळे निष्कामता | पुण्य वाढे ||**
कुकर्माचे ठायी | दुःखाचेच फळ ||
सदासर्वकाळ | पाप वाढे ||१||
वासनेच्या पोटी | पातकाचे बाळ ||
नियतीचा खेळ | आकळेना ||२||
शिंदीवृक्षा खाली | ताक प्रशियले ||
जन ऐसे बोले | शिंदी प्याला ||३||
म्हणोनी संगती | करावी संतांची ||
तेणे सत्कर्माची | गोडी लागे ||४||
जळते वासना | हरिनाम घेता ||
फळे निष्कामता | पुण्य वाढे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

अधमानां प्रवादे च
विवादे दुर्जनस्य वै।
संवादे सज्जनानां च
कालो गच्छति गच्छति।।१।।
अधमांचा काळ अफवा पसरविण्यात, दुर्जनांचा काळ भांडण्यात जातो. आणि सज्जनांचा काळ संवादात जात असतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बुरा न जग महँ कोइ मिला, सब गुण ज्ञान निधान।
बुरा नीच हम सम नहीं, हम ऐगुण अघ खान ।।२४।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)
०३/१०/२४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जगात वाईट कोणी भेटलं नाही, सर्वजण गुणांनी भरलेले मिळाले. माझ्यासारखं वाईट, नीच दुसरं कोणी नाही. मीच समस्त दुर्गुण आणि पापाची खाण आहे. असा भाव असणारी व्यक्ती सद्गुणांच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असते. अशा प्रकारचा भाव अभिमान येऊ देत नाही.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.www.vihangamyoga.org

## काव्य-चरितावली

### पुष्प -२२ वे



आधुनिक केसरी

गुरू-तुकामाईची सेवा दिनक्रम झाला
श्रीमहाराज गुरू सेवेत मनोमन रंगले
गुरू अंतःकरणातील ब्रम्हनिष्ठा आणिक
गुरूंच्या वात्सल्य ,प्रेमाने ते भारावून गेले ।।

श्रीमहाराजांना नसे प्रतीक्षा गुरू आज्ञेची
ते आपल्या गुरुसेवेत अखंड मग्न राहिले
गुरुसहवास घडला श्रीमहाराजांना, त्यांनी
गुरुसेवा कार्य अविश्रांतपणे सतत केले ।।

गुरुमाऊली तुकामाईची मनोवृत्ती ती
बालसुलभ वाटणारी ती अशीच होती
त्यांच्या वागण्या-बोलण्यातली विसंगती
श्रीमहाराज शांतपणे सारे सहन करिती।।

म्हणे कवी -अरुणदास -गुरू सेवा कठीण
गुरू श्रीमहाराजांची कठोर परीक्षा घेती ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## परमात्म्यावर पाहिजे पूर्ण निष्ठा

आधुनिक केसरी

आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही.

सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल ? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात



जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत अशा वेळी तू आत जा आणि बांगडया वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगडया वाजवून नमस्कार केला." त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी. तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी, ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान.

हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रल्हादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल. नामस्मरणात स्त्रीपुरूष, श्रीमंतगरीब, हे भेद नाहीत. फक्त ते श्रद्धेने घेणे जरूर आहे.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १३ एप्रिल २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# अवकाळीने हताश झालेल्या शेतकऱ्यांसाठी नाथ आले धावून

## तात्काळ पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला आदेश; मागच्या आश्वासनाचा मुख्यमंत्र्यांना विसर...!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे 8 एप्रिल रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीने व अवकाळी पावसाने प्रशासनाच्या अंदाजे प्राथमिक नुकसान 2500 हेक्टर क्षेत्रावर झाले आहे, त्याचे पंचनामे सूरू आहेत. यात 20 मोठी जनावरे, 900 कोंबड्या दगावल्या आहेत.

जिल्ह्यातील अनेक भागात अतिवृष्टीने बागायती तसेच पालेभाज्या व इतर पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. संकटकाळात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरकार कटिबद्ध असून सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी यासाठी एनडीआरएफ चे निकष बदलले आहेत. अवकाळी पाऊस, गारपिटीसारख्या संकटकाळात सरकार शेतकऱ्यांच्या कायम पाठीशी आहे.

शेतकाऱ्यांवरील अवकाळी पावसाचे अरिष्ट आणि इतर संकटे दूर करावीत, हीच मागणी अयोध्येत श्रीरामाकडे केली असे ही मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आले. एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. या दौऱ्या वेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, आमदार राणा जगजितसिंह पाटील, विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, औरंगाबादचे आई. जी. पी. के एम एम प्रसन्ना, उस्मानाबाद जिल्हाधिकारी डॉ सचिन ओम्बासे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.





**"मागील वर्षी सततच्या पावसाने नुकसानी पोटी सरकारने जाहीर केलेल्या रकमेचा बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यावर अजून छदाम नाही, तर गारपीठग्रस्तांसाठी मदत कधी मिळणार?"**


**जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर कोडे**

# "बालगीते" पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

छत्रपती संभाजीनगर : सौ. मंगला चौरे लिखित "बालगीते" या बालकाव्य संग्रहाचा प्रकाशन सोहळा दिनांक 11 एप्रिल 2023 मंगळावर रोजी सिडको एन-४ येथील चौरे यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात व कौटुंबिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.माधुरीताई चौधरी या होत्या. तर सेवाव्रती श्री प्रल्हाद पानसे काका यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन झाले तर प्रमुख पाहुणे प्रा.श्री ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी पुस्तकांवर सविस्तर भाष्य केले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा माधुरीताई चौधरी या म्हणाल्या की, "बालसाहित्य हे फार कमी लिहिल्या जाते. आणि मंगलाताई चौरे यांनी अतिशय सुंदर अशी बालगीत लिहिली आहेत. अगदी लहान मुलांच्या भावविश्वाचा आढावा घेणारी ही बालगीते असून मुलांना आवडतील अशीच सर्व गीत आहेत." पुस्तक प्रकाशन ज्यांच्या हस्ते झाले ते सेवाव्रती श्री पानसे काका यांनी आरोग्यमय जीवनासाठी गाणी किती महत्त्वाची असतात हे सहज आणि सोप्या भाषेत सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.श्री ज्ञानेश्वर कुलकर्णी( वतनी) यांनी.... "बालसाहित्य लिहिणे हे फार जिकिरीचे काम आहे. ते लिहिण्याची सहजासहजी कोणी हिंमत करीत नाही. कारण बाल कविता किंवा बालसाहित्य लिहिण्यासाठी बालकांचं मानसशास्त्र जाणता आणि जगता आलं पाहिजे. पण सौ मंगला चौरेंनी मात्र हे काम अगदी चोखपणे पार पाडलं आहे. सगळ्याच मुलांना आवडतील अशी आणि बालमन समजून घेऊन त्यांनी ही सुंदर अशी गीतं लिहिली आहेत." त्यांनी आपल्या मनोगतात संपूर्ण पुस्तकाचा आढावा घेतला. या प्रकाशन सोहळ्यानिमित्ताने कवयित्रींचे एक कावी संमेलनही आयोजित केले होते. यात वृषाली चाटोरीकर, संगीता मंडलीक,वैशाली कंकाळ,शिल्पा गडकर, सुनिता कपाळे,लता गवळी, दिपाली निनावे, कस्तुरी कुलकर्णी,लता पठाडे व कु.दिक्षा कुलकर्णी या कवयित्रींने आपल्या दर्जेदार कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रसिद्ध कवी सुनील उबाळे व गझलकार गिरीश जोशी यांनीही आपल्या रचना सादर केल्या. कर्यक्रमास डॉ.आरविंद मुळे,सौ.मुळे काकु,श्री आरविंद कुलकर्णी, सौ.कांचन मुळे व सुरज चौरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कु.दीक्षा कुलकर्णी हिने केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# सुभेदार जाधव यांचा निवृत्ती निमित्त गणोरी येथे सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

फुलंब्री तालुक्यातील गणोरी येथे सुभेदार प्रकाश सांडू जाधव यांनी २८ वर्ष देश सेवा करून पुणे कमांड हॉस्पिटल मधून दिनांक ०१/०४/२०२३ रोजी सेवा निवृत्ती झाले.त्यानिमित्ताने गणोरी ग्रामस्थांच्या,वतीने मित्रपरिवार, परिवाराच्यावतीने, त्यांचा भव्य नागरिक सत्कार मा.आ. हरिभाऊजी बागडे (नाना) मा.विधानसभा अध्यक्ष तथा आमदार फुलंब्री विधानसभा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती मा.सौ.अनुराधाताई चव्हाण माजी सभापती महिला व बालकल्याण समिती जि. प. छत्रपती संभाजीनगर,मा.श्री. सुहास भाऊ शिरसाठ तालुका अध्यक्ष भाजपा फुलंब्री,मा. सौ.सरलाताई तांदळे सरपंच गणोरी, मा.श्री. पंडित मामा उबाळे, चेअरमन विविध विकास सहकारी सोसायटी गणोरी, मा.श्री.नाथाप्पा काकडे, मा.श्री. विलास भाऊ उबाळे,मा.श्री. नामदेवजी काळे, व गावकरी माता भगिनी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजितदादांना बदनाम करण्यासाठी अंजली दमानिया यांचे भाजपपुरस्कृत ट्वीट - महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई दि. १२ एप्रिल - राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना बदनाम करण्यासाठी अंजली दमानिया यांनी भाजपपुरस्कृत ट्वीट केले आहे असा थेट आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याबद्दल बोलण्याचा अधिकार अंजली दमानिया यांना कुणी दिला असा सवालही महेश तपासे यांनी केला आहे. विद्यमान सरकारच्या अपात्रतेचा निकाल सुप्रीम कोर्टातून यायचा आहे. निकालानंतर नवीन चित्र निर्माण होईल असे ट्वीट अंजली दमानिया यांनी केले आहे याचा अर्थ त्या स्वतः ला प्रसिद्धी मिळवण्यासाठी करत आहेत असा टोलाही महेश तपासे यांनी लगावला आहे. राज्याच्या राजकारणात विरोधी पक्षनेते अजित पवार हे महाविकास आघाडीमध्ये एकत्रितपणे काम करत आहेत म्हणून बदनाम करण्यासाठी अंजली दमानिया यांनी हे ट्वीट केल्याचे महेश तपासे म्हणाले.




## चीनची भूमिका काय ?

आधुनिक केसरी

तीन वर्षांपूर्वी लडाखमध्ये एलएसीजवळ पिपल्स लिबरेशन आर्मीचे सैनिकांनी तळ ठोकला होता. चीनचा हा प्रयत्न भारतीय लष्कराने तेव्हा हाणून पाडला होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अरुणाचल प्रदेश दौऱ्यानंतर भारत-चीन सीमेवरील तणाव वाढला आहे. दोन्ही देशांमध्ये शाब्दिक युद्ध रंगलेले असताना आता भारताने त्याही पुढचे पाऊल टाकले आहे. यंदाचे जी २० चे अध्यक्षपद भारताला मिळाले असून, पुढील जी २० परिषदेची बैठक लेहमध्ये आयोजित केली आहे. सीमावादावरून चीनने घेतलेल्या आक्रमक पवित्र्यानंतर भारताने चीनला चोख प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे, अशी चर्चा आहे. यंदा जी-२० परिषदेचे अध्यक्षपद भारताला मिळाले आहे. भारतात विविध ठिकाणी बैठकांचे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. असं असतानाच दुसरीकडे भारत-चीन सीमावाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. त्यातच २६ ते २८ एप्रिलदरम्यान लेहमध्ये जी-२० परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला ८० देश सहभागी होणार आहेत. परंतु नेमके कोणते देश या बैठकीला हजर राहणार आहेत, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. याआधी अरुणाचल प्रदेशची राजधानी असलेल्या इटानगर येथे जी-२०च्या प्रतिनिधींच्या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीला चीनने बहिष्कार घातला होता. त्यामुळे आगामी बैठकीलाही ते बहिष्कार घालण्याची शक्यता आहे. तीन वर्षांपूर्वी लडाखमध्ये एलएसीजवळ पीपल्स लिबरेशन आर्मीचे सैनिकांनी तळ ठोकला होता. चीनचा हा प्रयत्न भारतीय लष्कराने तेव्हा हाणून पाडला होता. या घटनेनंतर आता भारताने जी-२० चं आयोजनच लेहमध्ये केल्याने चीनसाठी हा इशारा समजला जातोय. अरुणाचल प्रदेशच्या किबिथू येथे व्हायब्रंट व्हिलिजेस कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीमावादावरून चीनला डिवचले होते. भारतीय भूमीवर कोणीही अतिक्रमण करू शकेल असा काळ आता सरला असून सीमेकडे पाहण्याचे धाडसही कोणी करू शकत नाही, असं अमित शाह म्हणाले होते. यावरून चीननेही आक्रमक भूमिका घेत कांगावा केला. भारताने चीनच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन केल्याचा आरोप चीनने केला आहे. तसंच या भागातील अधिकाऱ्यांच्या हालचाली सीमा भागात शांतता राखण्याच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे त्यांना आमचा ठाम विरोध आहे, असं चीनच्या परराष्ट्र मंत्रालय प्रवक्त्याने स्पष्ट केले होते. अमित शाहांच्या या वक्तव्यामुळे सीमावाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. त्यातच, भारताने लेहमध्ये जी-२० परिषद बैठकीचं आयोजन केले असल्याने चीनच्या आक्रमक धोरणांना कठोर विरोध दर्शवण्याकरता भारताने हे पाऊल उचलले असावे, अशी चर्चा आहे.



श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## युनोच्या बघ्याच्या भूमिकेमुळेच नाटो सशक्त

आधुनिक केसरी

**रशिया - युक्रेन युद्धाला वर्षापेक्षाही जास्त कालावधी उलटल्यानंतरही या रक्तरंजित युद्धाला पूर्णविराम मिळाला नाही. रशियाने जेंव्हा युक्रेनवर हल्ला केला तेंव्हा राशियासारख्या बलाढ्य देशापुढे युक्रेनचा निभाव लागणार नाही. हे युद्ध जास्तीतजास्त महिनाभर चालेल. एका महिन्यातच रशिया युक्रेन पादाक्रांत करेल किंवा युक्रेन रशियापुढे शरणागती पत्करेल असे वाटले होते.**

राशियानेही त्याच अविर्भावात युक्रेनवर हल्ला केला मात्र आज वर्ष उलटून गेले तरी रशियाला युक्रेनवर पूर्ण विजय मिळवता आला नाही. युक्रेन आजही प्राणपणाने रशियाशी लढत आहे. विशेष म्हणजे हे युद्ध थांबावे यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही. संयुक्त राष्ट्र संघ अर्थात युनोने याबाबत पुढाकार घेऊन युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा होता. मात्र युनोने एखाद्या नोकरशाही प्रमाणे काम केल्याने हा संघर्ष वाढत चालला आहे. केवळ रशिया युक्रेन संघर्षातच नव्हे तर चीन - तैवान, उत्तर कोरिया - दक्षिण कोरिया, इस्राईल - सीरिया या वादातही युनोने नरो वा कुंजरोवा भूमिका घेतली आहे. चीनने तैवान सीमेवर ८० लढाऊ विमाने तैनात केली असून आता तैवानवर आभासी नव्हे तर थेट हल्ला करणार असल्याचा इशारा चीनने दिला आहे. चीनने जर तैवानवर हल्ला केला तर आणखी एका युद्धास सुरवात होईल. सीरिया आणि इस्राईल या देशांमध्येही काही दिवसांपासून चकमकी घडत असून दोन्ही देश एकमेकांवर क्षेपणास्त्रे डागत आहेत. उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग ऊन याने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली असून मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन करून दक्षिण कोरियाला इशारा दिला आहे. एकूणच जग तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर उभे असताना युनो मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. पहिल्या महायुद्धात झालेल्या प्रचंड मनुष्य आणि वित्तहानीमुळे अशाप्रकारचा संघर्ष भविष्यात होऊ नयेत म्हणून लीग ऑफ नेशन्स सारख्या एका संघटनेची स्थापना करण्यात आली होती. तरीसुद्धा





दुसरे महायुद्ध लढले गेले आणि त्यातही प्रचंड मनुष्य आणि वित्तहानी झाली. दुसऱ्या महायुद्धात तर अण्वस्त्रांचा वापर करण्यात आला. ज्यात लाखो लोकांचा बळी गेला. अनेक देशांची अर्थव्यवस्थाच संपुष्टात आली. युद्धाचे इतके घातक परिणाम समोर आले असतानाही युनोला काही करता आले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक छोट्या मोठ्या देशात लढाया झाल्या, युद्ध झाली. अजूनही चालूच आहे पण युनो मात्र मूक प्रेक्षक बनल्या शिवाय काहीही करू शकली नाही हे वास्तव आहे. आताही विविध देशात सुरू असलेले वाद सोडवण्याऐवजी युनो बघ्याची भूमिका घेत आहे म्हणूनच युनोवर कोणाचाही विश्वास राहिला नाही. युनोवर विश्वास नसल्यानेच फिनलंड सारखा देश नाटो संघटनेत सहभागी झाला आहे. उद्या जर आपल्यावर काही संकट आले तर युनो आपले संरक्षण करू शकणार नाही अशीच भावना राष्ट्राराष्ट्रात निर्माण होत आहे म्हणूनच हे राष्ट्र नाटो संघटनेत सहभागी होत आहेत. खरं तर दुसऱ्या महायुद्धानंतर युनो अधिक शक्तिशाली व्हायला हवा होता विशेषतः शितयुद्धानंतर. मात्र युनोने बघ्याची भूमिका घेतली. हीच बघ्याची भूमिका युनोला अशक्त करत आहे. युनोच्या याच बघ्याच्या भूमिकेमुळे नाटो मात्र सशक्त होत आहे.



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

## ना.धों .महानोर त्यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन

आधुनिक केसरी

**निसर्ग कवी ,ग्रामीण कवी व ज्यांच्या कवितेला रानातल्या मातीचा गंध येतो. ते कविवर्य ना. धों महानोर यांचे पूर्ण नाव नामदेव धोंडो महानोर, जन्म १६ सप्टेंबर १९९१ औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड येथे झाला. अनेक पुस्तके व पुरस्कारांचे मानकरी,औदुंबर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असलेल्या महानोर यांचा ' तिची कहाणी 'हा काव्यसंग्रह वाचत असताना एक पुरुष असून सुद्धा स्त्रियांच्या जीवनाचे हळुवार पैलू त्यांनी शब्दबद्ध केल्याचे दिसते. या कवितेत स्त्री व तिचे भावविश्व कवीने रेखाटले आहे. माहेर हा स्त्रीच्या जिव्हाळ्याचा विषय परंतु कौटुंबिक अत्याचार, कोवळ्या वयात अनेक बाळंतपणे, घटस्पोटीता व अकाली वैधव्य आलेल्या स्त्रियांसाठी माहेर कसे असते याचेही वर्णन कवीने केले आहे. या कविता गद्य सदृश्य आहेत.**

वंशाला दिवा हवा म्हणून अनेक बाळंतपणं जेंव्हा एखाद्या स्त्रीवर लादले जातात तेंव्हा तिला बाळंतपणासाठी माहेरी आल्यानंतर तिच्यासाठी माहेर कसं असतं ? हे कवी पुढील ओळीतून सांगतात.

ऐन पंचविशित म्हातारपण सोसताना...
तिचं भरल्या संसारात मन जळून जाताना...
कुठे शब्दही बोलण्याचा तिला अधिकार नाही
प्रत्येक गर्भारपणात माहेरच्या आठवणी ती जळून जाई...

माहेर जरी असलं तरीही तिथे पहिल्या एक दोन बाळंतपणाचे कोड कौतुक केलं जातं, परंतु मुलगा हवा म्हणून जर सात -आठ वेळा बाळंतपण होत असतील तर माहेरातही त्या बाळंतपणाचे कौतुक नसतं. तिला तिथेही अवहेलना सोसावी लागते. सासरचे लोकही मुलगा नाही म्हणून तिला शिव्या शाप देतात. माहेरचेही तिच्या बाळंतपणाला कंटाळतात. एखादा व्यसनी नवरा जेव्हा स्त्रीला खूप मारझोड करतो ,त्रास देतो व माहेरी ही कोणी उरलेलं नसतं तेंव्हा तिच्या मनाची अवस्था काय असते ती पुढील ओळीतून कवीने व्यक्त केली आहे.

माहेरी कोणीही उरलेलं नाही माझे मायबाप तुम्हीच. बापहो तुम्हीच सांगा मी कोणत्या रस्त्यावर राहू ? घरदार असून घर पाठीशी लागलेलं कुठल्या काळातलं पाप माझ्या नशिबी आलेलं... माहेरच हक्काचं कुणी नसल्यामुळे ती स्त्री गावातील लोकांपुढे हंबरडा फोडून मी कुठे राहू ? हा प्रश्न विचारते तिच्या अंग अंगावर नवऱ्याने मारलेल्या खुणा त्याचे व्रण दिसतात. त्याचेही वर्णन कवीने केले आहे. पुढे लग्न होऊन सासरी गेल्यानंतर बऱ्याच वर्षांनी माहेरी आलेल्या स्त्रीच्या मनाची अवस्था कवीने व्यक्त केली आहे.

लग्न होऊन जाताना... पुन्हा माहेरी येताना
गणमन भवरी, उध्वस्त गढीच्या शेजारी.
इतक्या वर्सांनी... वळू नयेत पाय किती वर्ष
लोटली तरीही.... डोळ्यांवर पिवळी कावीळ
अजूनही पसरलेली 'गरिबाघरची लेक' या कवितेत कवी म्हणतात.

माहेरच्या गरिबीत लगटून राहिलेलं.
तिच्या शब्दांचं मुकेपण...
भयभीत तिला कधी सांगताच आलं नाही
गरिबाघरची लेक जेंव्हा मोठ्याच्या घरी सून म्हणून जाते. तेंव्हा तिचा वारंवार अपमान केला जातो. माहेरच्या लोकांचा उद्धार केला जातो. परंतु माहेरी गरिबी असल्यामुळे ती हे सारे मुकाटपणे सहन करते. तिच्या भावना तिला कोणालाच सांगता येत नाहीत.

कोवळ्या वयात वैधव्याचे दुःख जिच्या नशिबी येते. तिच्या विषयीचे वर्णन कवीने पुढील ओळीत केले आहे. कुटुंबातल्या माणसांची रडारड केली.
तिची समजूत घातली. भरल्या डोळ्यांनी. भरल्या डोळ्यांनी. तिला परोपरी विनवलं.
सासरला राहण्यासाठी. माहेरी न जाण्यासाठी.
अठरा वर्षाच्या दिरासोबत पुन्हा लग्न करण्यासाठी. वटलेल्या संसारातून निघून गेलेल्या त्याच्या आठवणी डोळ्यात.

पंधरा वर्षांपूर्वी काडीमोड झालेल्या स्त्रीसाठी माहेर कसे आहे ?हे पुढील ओळींमध्ये कवी व्यक्त करतात. पंधरा वर्षांपूर्वीच तिचा काडीमोड झालेला. आता नजीकच्या खेड्यात एकटीच राहते. कोणीच न्याय निवाडा केला नाही गावात...
माहेरी ती दिवस-रात्र... काबाडकष्ट करते झोपड्यात. बऱ्याच वर्षानंतर माहेरी आलेल्या स्त्रीचे वर्णन करताना कवी म्हणतात, ती सुखरूप तिच्या संसारात. दूरच्या प्रदेशात.
दुसऱ्यांदा माहेरी आलेली चाळीस वर्षात. बदलून गेलेला गावचा चेहरा
तिला ओळखताही येत नाही
तिच्या सत्तर वर्षाच्या डोळ्यांनी
माहेरचं गणगोतही तिला नीट ओळखता आलं नाही. _सगळं बदलून गेलेलं.

बऱ्याच वर्षांनी माहेरी आल्यावर माहेरी झालेले बदल पाहून तिला तिचे गणगोत ही नीट ओळखता येत नाही. गोकुळासारखं नांदणारे माहेरचे जुनं घर व शेणानं सारवलेलं तुळशी वृंदावन आता सारं काही बदललेलं दिसतं. माहेरातल्या अनेक आठवणी विषयी कवी म्हणतात, तिचं लदबदलं माहेरपण हजार गोष्टींचं. माहेरच्या अनेक आठवणीने जणू तिच्या अंगावर दरवळता रुणझुणता माहेराचा वारा येतो. आपल्या आईच्या अनेक आठवणी कवी सांगताना दिसतात. गरीब परिस्थितीमुळे आईला स्वतःसाठी कधी नवीन चोळी लुगडं घेता आलं नाही. हे सांगताना कवी म्हणतात, तुझ्या चोळी लुगड्याला गाठी बांधल्या कितीक नव घालताना आम्हां साऱ्या जगाचं कौतिक

आईने सारे दुःख मुकपणाने सोसले तिच्याविषयी कवी म्हणतात,
कुठे शिकली गं माये, दुःख सोसण्याच्या वेणा साऱ्यांसाठी हासण्याचा पुन्हा खोटाच बहाणा.

कधी चिडलेल्या आईने आपल्याला खूप मारलं परंतु नंतर तिलाच आपली माया आली. तिचा जीव कासावीस झाला हे कवी पुढील ओळीतून कवी सांगतात,किती बदडले मला वळ अजून पाठीला
पुन्हा लपेटून तुझा जीव कासावीस झाला.
सारे झोपले तरीहि राती चुलीला पोतरा
निजताना गोंजारून पदरानं घाली वारा.

सासरी गेलेल्या लेकींच्या आठवणी सांगणाऱ्या आईच्या भावना कवितेतून कवीने व्यक्त केल्या आहेत. लेकी गेल्या दूर देशी जशा चिमण्या आकाशी त्यांचं नांदणारं घर तरी येते माहेराशी
आपल्या दूर गेलेल्या आईशी हितगुज करताना कवी म्हणतात, किती दिस आले गेले मीहि थकलो गं आई माझ्या दुःखाचे गाठोडे तुला सांगणार नाही आईच्या शेवटच्या क्षणी आईला आपल्याला काही बोलायचे होते व आपल्यालाही आईशी काही बोलायचे होते ते तसेच राहून गेले या भावना ही कविने व्यक्त केल्या आहेत.
निघताना दूर देशी अखेरच्या भेटीगाठी तुझे पानावले डोळे लपेटून ओटीपोटी किती सांगायचे होते शब्दथांबले ओठाशी साऱ्या चिडी पाखरांचे घर तुझ्या खाटीपाशी आईच्या लुगड्याच्या गोधडीचा स्पर्श कवीला खूप हवाहवासा वाटतो. ते म्हणतात, तुझ्या जुन्या लुगड्याच्या गोधडीचा परिमळ आणि देव्हाऱ्यासारखं तुझं आयुष्य निर्मळ तुझी शेतीबाडी, झाडी लक्ष पाखरांचा थवा जिवाभावाच्या नात्याचा माझा खरा गोतावळा.

आई निघून गेली तिच्या अनेक आठवणी कवीने कवितेतून व्यक्त केल्या आहेत. त्यांना जिवाभावाच्या नात्यांचा गोतावळा हवा आहे. अशाप्रकारे आपल्या 'तिची कहाणी' या संग्रहात कवीने प्रत्येक स्त्रीसाठी माहेर कसे आहे याचे वर्णन केलेले आहे. त्यांची ही कविता म्हणजे स्त्री जीवनाचे त्यांनी केलेले सूक्ष्म निरीक्षणच आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जलनिती



प्रवीण काळे
संपर्क ८६९८७०१९५५

आधुनिक केसरी

**चौथे महायुद्ध झाले तर ते पाण्यामुळे होईल असे अनेक संशोधकांनी विचारवंतांनी भाकीत करून ठेवले आहे. आज जगभरात जलकलह सुरू आहे नव्हे तो अधिकाधिक तीव्र होत आहे.जल प्रकल्प सीमावाद प्रादेशिक वाद हे मुद्दे प्रकर्षाने समोर येताना दिसतात एकंदरीतच जगातच पाण्याच्या दृष्टीने असलेले शून्य नियोजन त्याचबरोबर भारतात तर याबाबतीत झालेले पूर्ण दुर्लक्ष आजच्या जलपरिस्थितीस कारणीभूत ठरत आहे.**

अलीकडच्या काळात पाण्याच्या प्रश्नावरून कर्नाटक आणि तमिळनाडू असा एक संघर्ष अल्पकाळासाठी का होईना आपल्या पाहायला मिळाला, मराठवाड्यात रेल्वेने पाणी आणण्याचा प्रयोग झाला या पार्श्वभूमीवर भारतातील जलविषयक धोरण याविषयी क्रांतीसुर्य , प्रज्ञा सूर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेली जलनीती खूप महत्त्वाचे वाटते. डॉक्टर बाबासाहेबांनी सांगितलेल्या जलनितीकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले दिसते पूर्वीच्या काळी डोंगराई ,वनराई ,झाडे लावा झाडे जगवा अलीकडच्या काळात काही जल है तो कल है यांसारख्या कार्यक्रमातून झालेली जनजागृती फुल ना फुलाची पाकळी या जलनियोजन प्रक्रियेसाठी महत्त्वाची ठरते.

प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर सरांच्या जलदिंडी अभंगातील चार ओळीं प्रबोधनकारी ठरतात

पाणी आडवावे || पाणी जिरवावे||
पाणी वापरावे || जीव भावे ||
पाणीच आधारू || जपून वापरू||
घाण कैसै करु || नदी नाले ||

या साऱ्या प्रबोधनरूपी काव्याला गावागावात व घराघरात पोहचवणे आज काळाची गरज आहे. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व्हॉइस रॉयच्या मंत्रिमंडळात मजूर खात्याचे मंत्री होते या खात्याबरोबरच जलसिंचन आणि ऊर्जा विभाग सुद्धा या मंत्रालयाला जोडला होता या तीनही महत्त्वांच्या विभागाच्या नियोजनाचा पाया डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात घातला गेला प्रकल्पग्रस्ताच्या पुनर्वसन समितीचे अध्यक्ष म्हणूनही बाबासाहेबांनी काम पाहिले आहे श्रम, जल ,वीज बहुउद्देशीय धरण प्रकल्पाची संकल्पना सर्वप्रथम बाबासाहेबांनी मांडली आहे केंद्रीय जल आयोग केंद्रीय विद्युत आयोग ठाकूर दामोदर वसुंधरा नदीवरील नदी खोरे प्रकल्पाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मंत्री काळात झालेली आहे 1942 ते 1946 या चार वर्षाच्या कालावधीत अखिल भारतीय जलधोरणाचे पायाभरणी झाली जलसिंचन आणि विद्युत ऊर्जेची नेत्रदिपक प्रगती झाल्याचे दिसून येते जलसंपत्तीचा वापर फक्त एका उपयोगासाठी न करता सिंचन, नौकानयन ,औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जलऊर्जा विकसित करणे एखाद्या विशिष्ट राज्यापुरता किंवा लहान प्रदेशाचा विचार न करता संपूर्ण नदी खोऱ्याचा विकास करणे आणि त्याची सामाजिक आर्थिक आणि पर्यावरण विकासाच्या उद्दिष्टांशी सांगड घालणे अशाप्रकारे छोट्या छोट्या प्रयोगातून समग्र विकासाची उद्दिष्ट साध्य होणार होते उपलब्ध जलसंपत्तीपैकी दोन तृतीयांश जलसंपदा ही गंगा ब्रह्मपुत्रा मेघना या नद्या खोऱ्यातून तसेच भारताच्या भौगोलिक क्षेत्रापैकी एक तृतीयांश क्षेत्रभेटणाऱ्या क्षेत्रातून उपलब्ध होते ही व्यस्त प्रमाण स्थिती पूर व त्यापासून उद्भवणाऱ्या समस्यांना भारतीय जनतेस सामोरे जावे लागते ज्या क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष आहे तेथील जनतेस दुष्काळी परिस्थिती व त्याच्याशी निगडित समस्यांची मुकाबला करावा लागतो या सर्व समस्यांची मांडणी बाबासाहेबांनी नदीजोड प्रकल्पाच्या अफलातून अशा संकल्पनेतून मांडली आहे समस्या व त्याचे निवारण करण्याची डॉक्टर बाबासाहेबांची हातोटी वेगळीच होती. नदी जोड प्रकल्पामुळे सिंचन नौकानयन



भीमजयंती विचारमाला
भाग : चार

औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जल ऊर्जा विकसित करणे अर्थात भारताच्या आर्थिक विकासासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सतत प्रयत्नशील होते

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले की, जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसित देशांनी अंगिकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्याचा बहुउद्देशीय वापर करणे, धरणे बांधून, जलसिंचनाशिवाय नद्यांचा जलसाठा करणे, त्याचा सिंचनासाठी उपयोग करणे, इत्यादी बाबी साध्य करता येतात. गेल्या काही वर्षांपासून आपण नद्याजोड प्रकल्पाची चर्चा करीत आहोत, ही चांगली गोष्ट आहे. पण याबाबत अनेक विधायक कल्पना शंभर वर्षांपूर्वी बाबासाहेबांनी मांडल्या होत्या बाबासाहेबांचा उदात्त हेतू, त्यांचा दूरदृष्टीपणा, सर्वसामान्यांसमोर आलेला नाही किंवा तो आणल्या गेला नाही, असे म्हणता येईल. आपल्याकडच्या मोठ्या नद्या दरवर्षी १,११,०१३ दशलक्ष घनमीटर पाणी समुद्रात सोडतात. या पाण्याचा वापर ( वीज, वाहतूक, सिंचन ) केल्यास विकास होऊ शकतो. यावर बाबासाहेबांचा विश्वास होता.

बाबासाहेबांशिवाय जल व्यवस्थापनाच्या बाबतीत कुणी सखोल विचार केला नाही व दूरदृष्टीपणा दाखविलेला नाही आणि म्हणून बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने या देशाचे हितचिंतक ठरतात. त्यांच्या दूरदृष्टीपणावरून ते सर्वश्रेष्ठ ठरतात हे नाकारून चालणार नाही. जागतिक स्तरावर डॉ.बाबसाहेबांची जलनिती अभ्यासल्या जाते त्याची अंमलबजावणी केली जाते. आपणही या दृष्टीने पुढे जाणे आवश्यक आहे.

# 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला ( आप ) राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने ही घोषणा केली आहे. तृणमूल काँग्रेस (टीएमसी), सीपीआय आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी आता राष्ट्रीय पक्ष नाहीत. काही दिवसांपूर्वी आम आदमी पक्षाने (आप) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळावी यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या विलंबामुळे त्यांच्या निवडणूक लढवण्याच्या क्षमतेला बाधा येत असल्याचे या याचिकेत म्हटले होते.**

दिल्ली, गोवा, पंजाब आणि गुजरात या चार राज्यांतील निवडणुकीतील कामगिरीच्या आधारे 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्यात आल्याचे आयोगाने म्हटले आहे. दिल्ली आणि पंजाबमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्ष सत्तेत आहे. एनसीपी, सीपीआय आणि तृणमूल काँग्रेस या राष्ट्रीय राजकीय पक्षांचा दर्जा काढून घेण्यात आल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. भाजप, काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-मार्क्सिस्ट (सीपीआय-एम), बहुजन समाज पार्टी (बीएसपी), नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीपी) आणि आम आदमी पार्टी हे आता राष्ट्रीय पक्ष आहेत. एखाद्या राजकीय पक्षाला लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत चार किंवा त्याहून अधिक राज्यांमध्ये किमान ६ टक्के मते मिळाल्यास तो "राष्ट्रीय पक्ष" म्हणून ओळखला जातो. याशिवाय त्यांना लोकसभेच्या किमान चार जागा जिंकायच्या आहेत.

राष्ट्रीय पक्ष होण्यासाठी कोणत्या अटी आहेत?

४ राज्यांमध्ये एखाद्या पक्षाला प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाल्यास त्याला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळू शकतो. जर एखाद्या पक्षाने तीन राज्यांमध्ये लोकसभेच्या ५० टक्के जागा जिंकल्या तर त्याला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळू शकतो. लोकसभेच्या ४ जागांव्यतिरिक्त, एखाद्या पक्षाला लोकसभा निवडणुकीत किंवा विधानसभा निवडणुकीत ४ राज्यांमध्ये ६ टक्के मते मिळाल्यास हा दर्जा मिळू शकतो. जर एखाद्या पक्षाने या तीनपैकी एकही अट पूर्ण केली तर त्याला राष्ट्रीय पक्षाचा दर्जाही मिळतो. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर, आम आदमी पार्टीला हे फायदे मिळू शकतीलः १. आम आदमी पार्टीचे निवडणूक चिन्ह झाडू कायमस्वरूपी होणार आहे. आता संपूर्ण देशात आपचे एकच निवडणूक चिन्ह असेल. पक्षाचे हे झाडू चिन्ह त्यांच्यासाठी राखीव राहणार आहे.या चिन्हावर अन्य पक्षाचा उमेदवार निवडणूक लढवू शकणार नाही.

२. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर, आम आदमी पक्षाचे उमेदवार आता मतपत्रिका/ईव्हीएमसाठी उमेदवारांच्या यादीत वरच्या क्रमांकावर दिसू शकतील.

३ आम आदमी पार्टीला देशाच्या राजधानीत कार्यालय मिळू शकेल.

४. आतापर्यंत आम आदमी पार्टीला मतदार यादी मिळवण्यासाठी काही पैसे खर्च करावे लागत होते, मात्र आता आम आदमी पक्षाला प्रत्येक राज्यात मतदार यादी मोफत मिळवण्याचा अधिकार मिळणार आहे.

५ राष्ट्रीय स्तरावर आता आम आदमी पार्टी २०पेक्षा जास्त स्टार प्रचारकांना आपल्या यादीत समाविष्ट करू शकते. ही संख्या आता ४० पर्यंत वाढणार आहे.

६ राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यानंतर आम आदमी पार्टीला आता राष्ट्रीय स्तरावरील निवडणुकांमध्ये सर्वसामान्यांना संबोधित करण्यासाठी रेडिओ आणि टेलिव्हिजनवर वेळ मिळणार आहे.



७. राष्ट्रीय दर्जा असलेल्या पक्षाचा अध्यक्ष सरकारी निवासस्थान मिळण्यास पात्र आहे.

८. आता राष्ट्रीय दर्जा मिळालेल्या पक्षाच्या नामनिर्देशन पत्रात फक्त एकच प्रस्तावक आवश्यक असेल.

महाराष्ट्र Business Katta













# बहुआयामी साहित्यिक व्यक्तिमत्त्व- अरुण देशपांडे



चारुशीला गोखले -बंगलोर
संपर्क क्र.: 96231 86265

आधुनिक केसरी

**मी चारुशीला गोखले बंगलोरला असते. प्रतिमा आणि प्रतिभा साहित्य समूह ",या व्हाट्सअप्प ग्रुपवर माझा "साहित्यिकांच्या मुलाखतीचा "सुरू आहे , या उपक्रमातील "अकराव्या मुलाखतीच्या निमित्ताने', समूहातील जेष्ठ लेखक- कवी श्री.अरुण वि.देशपांडे यांची मी घेतलेली मुलाखत ,सर्वांशी शेअर करतांना मला मनस्वी आनंद होतो आहे. 40 वर्षांपासून सातत्यपूर्ण लेखन-प्रवास करणाऱ्या या " बहुआयामी व्यक्तिमत्वाचे अंतरंग "जाणून घेणे नक्कीच आवडेल.**



मीः सर आपले पूर्ण नाव? तसेच आपले मूळ गाव कुठले?
सरः - नमस्कार
माझे पूर्ण नावः अरुण विठ्ठलराव देशपांडे
लेखन नावः अरुण वि. देशपांडे
आमचे मूळगाव परभणी ( मराठवाडा),
जन्म दिनांक - 08-08-1951,
*मी *- सर , तुमच्या साहित्य प्रवासबद्दल जाणून घेणे महत्वाचे आहे, म्हणून फक्त तेच प्रश्न विचारते.
प्रश्न - आपल्याला कविता करण्याची आवड कधी पासून आहे?
पहिली कविता कधी केली ते आठवते का?
सरः - माझा लेखन प्रवास सुरु झाला तो 1983 साली, आता 2023 मध्ये चालुच आहे, विशेष म्हणजे या वर्षी आता या लेखनप्रवासाला चाळीस वर्षे होत आहेत.
सुरुवातीला म्हणजे - १९८३ ते १९९८ अशी सलग १५ वर्ष मी फक्त कथालेखन करीत असे.
१९९८', या वर्षात पहिली कविता "कोजागिरी" लिहिली .
२०११ ' ,पासून इंटरनेटवर विपुल काव्य लेखन सुरू आहे. हिंदी काव्य लेखनही नियमित सुरू असते.
1.माझा पहिला काव्यसंग्रह- गाणे दिवाने २००३ साली,
आणि -
2. पहिला बालकवितासंग्रह -गोड गोड चिकोबा २००३ साली प्रसिद्ध झाला.
3.पहिला हिंदी कवितासंग्रह- जीवन सरिता मेरी कविता (यात १११ कविता आहेत ), २०२१ साली प्रसिद्ध झाला.

मीः- हे ऐकून तर आता मला "अबबब !...असेच म्हणावे लागेल!.., आपल्या प्रतिमा आणि प्रतिभा समूहावर "आपल्या रचना आम्ही वाचतो आहोतच .

मी *- सर, आपल्याला अजून काही वेगळे करायचे होते ,आणि घडले वेगळे असे काही झाले आहे की जे ठरवले तेच झाले?

सरः साहित्य - कलेची आवड असल्यामुळे एम ए. मराठी करून प्राध्यापक व्हावे, लेखक- कवी व्हावे असे वाटे. प्रत्यक्षात असे झाले नाही .

1972 मध्ये मी बी.कॉम झालो,स्टेट बँक ऑफ हैद्राबाद "मध्ये लागलो , पुढे 33 वर्ष कार्यकुशल बँक कर्मचारी म्हणून लौकिक मिळवला.

1983 साली माझी बदली परभणी जिल्ह्यातील गंगाखेडला झाली, इथेच मला माझे साहित्य-गुरू " प्रा.दीनानाथ फुलवाडकर आणि प्रा.मधुकर देशपांडे हे दोघे भेटले .
जणू गोदावरीकाठी माझ्यातील लेखन गंगोत्री उगम पावली . इथून पुढे मी चिकाटीने, निष्ठेने लेखन सुरू ठेवले आहे.

परभणीच्या अनुकूल वातावरणात साहित्यिक- कवी -, मित्र झाले, बालसाहित्य चळवळीतील कार्यकर्ता, आणि साहित्यिक कार्य करतांना, बँकेतील नोकरीला काकणभर जास्त महत्व दिले.

साहित्याच्या प्रेमापोटी", प्रमोशन घ्यायचे नाही ,असे 1986 साली ठरवले.
परभणीला असलेल्या 4 शाखात काम करण्यात पुढची 20 वर्ष गेली.

बँकेतील नोकरीत मन लावून काम केले, साहित्य क्षेत्रात समरसतेने वावरलो.
यामुळे एक झाले बँकेत माझी ओळख "साहित्यिक" अशी झाली, आणि साहित्यक्षेत्रात " बँकवाला छान लिहितो" हे कौतुक झाले .

" लेखक तुमच्या भेटीला "या साहित्य-उपक्रमामुळे, अनेक ठिकाणी जातो, तिथे सारेजण मला शिक्षक, प्राध्यापक समजतात, त्यांच्यासाठी मी "सर " असतो.
म्हणजे बघा -" बँकेतल्या माणसाला, साहित्याने प्राध्यापक गुरू - शिक्षक , सर " बनवले ".

मीः सर हे सगळेच अभूतपूर्व आहे!

*मी * - 40 वर्षांच्या तुमच्या दीर्घ लेखन प्रवासातील तुमच्या प्रकाशित साहित्याबद्दल थोडेसे सांगावे -

*सर *- माझ्या सगळ्याच प्रकाशित साहित्याबद्दल इथे सांगता येणार नाही.
अलीकडे प्रकाशित काही पुस्तकांचे मी उल्लेख करतो .

वर्ष -२०२२ -पर्यंत एकूण प्रकाशित पुस्तकांची संख्या 74 झाली आहे.
मोठ्यासाठी- पुस्तके 41 , बालमित्रांसाठी- पुस्तके- 33 ,
यातली -प्रिंट बुक्स - 42 ,ई-बुक्स- 32 आहेत.

काही नवी पुस्तके अशी -
1.प्रिंट बुक्स- १..हे मनाचे खेळ सारे - ललित लेख संग्रह (२०२१), २.नवा आरंभ -बालकथा ,३.एका पेक्षा एक बालकविता - (२०२१), ४. माझे आबा आज्जी - बालकविता(2022),

2.हिंदी कविता संग्रह -जीवन सरिता मेरी कविता (२०२१)
***
३. ई- कथा संग्रह - माझ्या काही अलक ( २०२२ ),
ई-बुक- कविता -संग्रह- १.जीवनभान-(२०२० ) २..मोरपीस -(२०२१),

* मी * - तुम्हाला कुठली कुठली awards/ certificates मिळाली आहेत?

सरः 40 वर्षांच्या आतापर्यंतच्या दीर्घ लेखन प्रवासात
१.साहित्य व लेखन योगदानाबद्दल,
२-साहित्यकृतींसाठी, ३.बालसाहित्यातील योगदानाबद्दल असे हे विविध पुरस्कार आहेत .
यातील काही उल्लेखनीय पुरस्काराबद्दल सांगेन -
१.2008-09- महाराष्ट्र शासनाचा 'बालसाहित्य समीक्षेचा दि.के.बेडेकर - समीक्षा पुरस्कार -माझ्या "बालसाहित्य मराठवाड्याचे-नवे स्वरूप-नव्या वाटा "या ग्रंथास प्राप्त.

२. स्टोरीमिरर या ई -साहित्य संस्थेचा Author of the Year-2018 पुरस्कार.

३. मातृभारती मराठीचा "2019 चा लेखन विषयक विशेष उपलब्धी पुरस्कार.

४. ई-साहित्य प्रतिष्ठान, प्रतिलिपी मराठी,सप्तर्षी ई प्रकाशन,मातृभारती मराठी , शॉपिझेन ,यांनी माझ्या ई बुक्सचे प्रकाशन केले आहे.

मीः सर तुम्हाला मनःपूर्वक नमस्कार करतेय आणि आपल्या संपूर्ण समूहाकडून पण नमस्कार स्वीकारावा!

आमचे भाग्य आहे की अशी निर्लेप व्यक्ती आज आमच्या समूहात अगदी जवळ आहे आणि आम्हाला तिची माहितीच नव्हती. आज मी घेतलेल्या ह्या मुलाखतीत माझीच पाठ थोपटून घेतेय.

तुमचा सहवास आपल्या समूहाला कायम मिळो. आपले मार्गदर्शन पण आम्हाला अवश्य मिळावे ही आपल्याला नम्र विनंती. आपल्याला खूप खूप शुभेच्छा!
सरः आपणा सगळ्यांना नमस्कार -धन्यवाद!



# पीळ

आधुनिक केसरी



**दिनूला घरच्या लोकांच्या माघारी आपण पोरीला आणायचं हे बर नाही दिनू हे वेड्या पणाच लक्षणं आहे आबा पाठ लावून बसत बायकोकडे पाहिले तिचे रडणं कमी झाले होते पण फुसफुस आजून चालू होती आबांनी तिच्याकडे पाहिले अनुसयाची नजरेला नजर झाली बायकोच्या त्या नजरेत माझ्या निश्चयाची धार दिसून आली होती.**

उन्हाळ्याचे दिवस होते आबा वापस घरी आले ओसरीचा दरवाजा ओलांडून आबांनी दारात पाऊल ठेवले नी ठेवले आबाच्या समोर जे दिसले ते पाहून ते जागच्या जागीच थांबले अनुसयाने म्हणजे त्यांच्या बायकोने रडण्याचा मोठ्या ने सपाटा लावला आई रडायला लागली म्हणून मोठा मुलगा जवळ येऊन तिची समजूत काढू लागला.
अशावेळी बायको का? रडते ते आब्याच्या लक्षात येईना अचानक त्यांची नजर धाकट्या दिनकर कडे गेली मग त्या गोष्टी चा उलगडा झाला त्यांना सुद्धा कसतरी झालं आपल्या पायातल पायतान कोणीतरी काडून घेतलं असल्यागत वाटू लागलं कस बस चालत ओसरीत आले खाली बसता बसता त्यानी विचारलं काय झालं दिनकर रागात म्हणाला दिनकर पाठवत नाही म्हणाला सावड नाही म्हणाला पाठवायला कामे चालू आहे तरी मी तुम्हाला म्हणालो होती आणायला जाऊ नका तो पाठवणार नाही पण माझ ऐकत कोण बघा तुम्ही, आबा थोडे सावरून बसले पण तेवड्यात दिनकर उठत आबाला म्हणाला, आबा ही वेळ बसायची नाही. उठा आता आपल्याला येसगावला जायचे आहे वेनूला आणायला. अरे दिनकर तो पोरीला पाठवत नाही म्हणतो मग आपण कशाला जायचं ? दिनू म्हणाला आहे आबा तो लाख नाही म्हणेन पण त्यांच आयकतोय कोण ? गुपचित घेऊन येऊ तिला आबा म्हणाले दिनूला घरच्या लोकांच्या माघारी आपण पोरीला आणायचं हे बर नाही दिनू हे वेड्या पणाच लक्षणं आहे आबा पाठ लावून बसत बायकोकडे पाहिले तिचे रडणं कमी झाले होते पण फुसफुस आजून चालू होती आबांनी तिच्याकडे पाहिले अनुसयाची नजरेला नजर झाली बायकोच्या त्या नजरेत माझ्या निश्चयाची धार दिसून आली होती, आबा दिनकर कडे पाहात म्हणाले आरे वेडेपणा आहे तिचा, दिनकर हळूच म्हणाला आबाला तिचा बी वेडेपणा कसा म्हणता येईल वेसुचे लग्न होऊन आता दोन वर्षे झाली जशी सासरी गेली तेंव्हापासून आजपर्यंत तिने वेणूची तोंड नाही बघितले मायेच्या काळीज आता काहोर दम सारीन आबा हळूच म्हणाले आरे कोसिस म्या भी केली होती, हाता पाया पडलो मी माफ करा

जगन्नाथ जाधव
येसगाव, ता. खुलताबाद
संपर्क : ७७२१०४५८४५

म्हणलो आमच काही चुकलं हुकल असेल तर मी तुम्हाला देयाला तयार आहे पण पोरीला एकदा तरी माईला भेटायला धाडा पण नाही दिनू उत्साहात म्हणाला आबा आपण घेऊन येऊन बघू काय होतंय ते आबा हसत म्हणाले बोलायला खूप सोपं आहे पण पाहिलं तर खुप अवघड आहे आणि तू आता लहान नाही अश्या गोष्टी करायला आबा तुमच्या पायाला शिऊन सांगतो जे होईल ते होईल मी वेणुला घेऊन येणारच मग आबा चटकन म्हनाले नवरा नाही आला तिला नेयाला मग ती इथंच राहिली तर मग नवरा असून रांडव राहावे लागेल अस बेवारस राहिल्या सारखे राहावे लागेल तुला बघितल्या जाईल का तीच दुःख डोळ्याला पदर लावीत अनुसया दिनूला म्हणाली नको जाऊ पोरा राहूदे त्यांना मी नकोशी झाले होउदे त्यांच्या मना सारख माझं दु ख कुठ कळत त्यांना दिनू नीट बसत म्हणाला आबा मी तुम्हला स्पष्ट सांगतो माझ्या आईच सुख तुम्हाला पाव्हेना झाले आबा दचकून म्हणा ले काय ?
लेकीला घेऊन आलो तर तुम्हाला वाटतंय लेक संसारातून उठेल आणि तिला नाही आणलं तर आमच्या आईच्या वाटायला दु ख मिळेल आबा तर एकदम गप्प बसले दोघे मायलेक इतके हट्टी की त्याच्या हट्ट पायी आबा हतवले झाले काय होयाचे होऊन जाऊ दे बोलावे आबां सगुमसुम पणे मान खाली घालुन ते गप्प बसले आबा विचारात पडले अनुसायला लेकीच वेड लागलं पोरग पण तिची बाजू घेऊन बोलत होता अनुसया म्हणाली दिनू माझं ऐक पोरा राहूदे तिला आणायचे माझा काय सरल आता कुणाला काय आज गेले काय आण् उद्या गेले काय सारखेच अनुसयाचे हे शब्द आबाचे पार काळीज कापीत नेले भला मोठा लांब लचक स्वास घेत म्हणाले आबा म्हणाले जा बाबा या घेऊन येऊ बाघू जसे होईल तस तिचे दोघे मायलेक वेणूला आणायला गेले घरात बसले पाहुणचार पण झाला हळूच दिनू म्हणाला आम्ही वेणूला घेण्यासाठी आलो वेणूची सासू म्हणाली ईहीन बाई आम्ही पोरीला पाठवत नाही तस आबाला सांगितलं होतं तिला आता आठवा महिना चालू आहे तिचे आता नाजूक दिवस आहे तुमच्या कडे जवळ कुठे दवाखाना नाही खूप लांब यावं लागते आशवेळीत पोरीला आराम पाहिजे तिची दगदग नको होयला बाळंतपण झाले की मग घेऊन जा आठ दहा दिवस लेकीला दिनूला व अनुसायला पण काहीच बोलता येईना दोघानी पाहुण्यांचा निरोप घेतला आणि घराला आले आबा घरी बसलेले होते आबा हळूच म्हणाले झाला तुमचा पीळ शांत.

# "अंजनीसुता"



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

चैत्र महिन्यात राम जन्मोत्सव नवमीला झाल्यावर चैत्र शुद्ध 15 ला हनुमान जयंती असते. बल,शक्ति,भक्ति,आदरयुक्त भाव हे हनुमत प्रभुचे वैशिष्ट्य. गौतमऋषींची कन्या अंजनी व सुमेरीचा राजा केसरी नंदन यांचा हा पुत्र. जन्मल्या बरोबर म्हणजे तांबडं फुटायच्या वेळेला पहाटे 6 वाजता जन्म झाला आकाशातला सुर्य जणू काही लालभडक गोळाचं आहे तो हातात धरायची ईच्छा झाली. वायुवेगाने पळत सुटला म्हणून पवनपुत्र म्हटले जाते. अशा हनुमंताच्या जन्माच्या वेगवेगळ्या कथा आहेत. त्या आपण आता पाहुया. *पुत्रकामेष्टी यज्ञातून निघालेल्या प्रसादापैकी काही प्रसाद घार घेऊन गेली. घारीच्या चोचीतुन प्रसादाचा काही भाग जप तप करत असलेल्या अंजनीच्या ओटीत पडला म्हणून हनुमानाचा जन्म झाला.अशा अनेक दंतकथा आहेत. मित्रानो बजरंग बलीच्या जन्मकथा कोणत्याही असु दे तुम्ही तरूणांनी या बलभीमाची आराधना केली पाहिजे. समर्थानी तर बलोपासने साठी अख्यां भारतभर पायी फिरून शक्तिची जाणीव करून देण्यासाठी मारूतिची मंदिरे व तरूणांना व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी प्रत्येक गावखेड्यात तालमी उभारल्या. तरूणांना जातपात विरहित भेदरचनेच्या पुढे नेण्याचे श्रेय श्री स्वामी समर्थांना दिले पाहिजे. तरूणाईला बलोपासनेतुन शरिरसौष्ठव त्यातुन पिळदार शरीरयष्टी मिळवण्याचा संदेश दिला आहे. जीम काय ? किंवा फिटनेस सेंटर काय याची कल्पना समर्थानी साडेतीनशे ते चारशे वर्षांपासून दिली आहे. प्रभु रामचंद्राचा



आदर्श भक्त सीता मातेला शोधून देण्यासाठी अतुलनीय शौर्य दाखवले. संजीवनी ही वनस्पतीचा उपयोग राम रावण युद्धात मेलेल्यांना जीवंत करण्यासाठी केला. त्यासाठी चक्क द्रोणागिरी पर्वतच ऊचलुन आणला. असा हा महाबुध्दीमान हनुमाची मनापासून सेवा केली तर रोगव्याधी,चिंतादूर होतात. रूप व विद्या लाभते.ज्याच्या दर्शनाने आलेला काळ सुध्दा भयाने कापतो असे समर्थानी सांगितले आहे. अशा या रामदास्याला आजच्या दिवशी कोटींच्या कोटी वंदन करूया. दरवर्षी साज-या होणा-या हनुमान जयंतीचं महत्व पुढच्या पिढीला कळावं आपल्या देशाचं सामर्थ्य वाढविण्यासाठी व सकलशत्रुसंहारकाय हनुमानाची भक्ति करूया.राम दूताय नमो नम.

# कानडगाव येथे आरोग्य विभागातर्फे ग्रामीण आरोग्य स्वच्छता आणि पोषण समितीची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

खुलताबाद : दि. १० एप्रिल रोजी आरोग्यवर्धिनी केंद्र कनकशीळ च्या वतीने कानडगाव येथे ग्रामीण आरोग्य स्वच्छता आणि पोषण समिती (VHSNC) ची स्थापना करण्यात आली. गावचे नवनिर्वाचित सरपंच श्री तान्हाजी कचरू साबळे यांचा या प्रसंगी श्री विजय जाधव यांनी सत्कार केला. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके यांनी प्रास्ताविक करत या समितीचा उद्देश समजावून सांगितला. आरोग्य विभाग आणि सामान्य नागरिक यांच्यातील दुवा म्हणुन ही समिती काम करेल आणी गावात आरोग्य, स्वछता, पोषण, शिक्षण यात अमुलाग्र बदल या माध्यमातून निश्चित घडुन येतील असे यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी यांनी सांगितले.

यावेळी पूर्ण समितीची स्थापना करून सदस्यांना त्यांचे कार्य आणि अधिकार याविषयी माहिती देण्यात आली.

या सभेसाठी सरपंच कचरू तान्हाजी जाधव, ग्राम पंचायत सदस्य निर्मला जाधव,आरोग्य सहायक विजय जाधव, आरोग्य सेविका ज्योती चिमणे, आरोग्य सेवक सुनील कर्पे,गट प्रवर्तक भागूबाई जाधव, जि. प. शिक्षिका एस जाधव,अंगणवाडी सेविका सुनीता जाधव,अलका जाधव, सागर साबळे, सुरेश जाधव, सुनील लहाने व समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई येथील एम पी एच चे अभ्यास दौऱ्यासाठी आलेले विद्यार्थी डॉ पार्वती वारीयर, डॉ रसिका तडस, शेरोसी थॉमस, रुपायन दास यांनी समितीच्या सदस्यांनसोबत सवांद साधत समितीच्या कामकाज जाणुन घेतले.




# भाजपा खुलताबादची संघटनात्मक आढावा बैठक



आधुनिक केसरी न्यूज

भारतीय जनता पार्टी रत्नपुर-खुलताबादची संघटनात्मक आढावा बैठक दिनांक 10/4/2023 वार सोमवार सकाळी 10:30 वा शासकीय विश्रामगृह खुलताबाद येथे मा आमदार श्री.प्रशांतजी बंब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मा.संघटन मंत्री श्री संजयजी कोंडगे, मा.जिल्हाध्यक्ष श्री विजयजी औताडे,विभागीय कार्यालय प्रमुख धनंजय कुलकर्णी याच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली आहे, या बैठकीचे प्रस्ताविक भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यानी केले या बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

बुथ सशक्तिकरण अभियान, स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा आढावा, सामाजिक न्याय सप्ताह अभियान आढावा या तिन्ही विषयावर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली असुन सर्व अल्पविस्तारक यानी बुथ स्तरावर जाऊन बुथ समितीची बैठक घ्यावी या बैठकीत 11 प्रमुख लोकांची निवड करून जबाबदारी देण्यात यावी , पन्ना प्रमुखाची निवड करण्यात यावी अशा प्रकारच्या सुचना संघटन मंत्री संजयजी कौडगे यानी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या.

या बैठकीस रत्नपुर-खुलताबाद तालुक्यातील भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, जि.प उपाध्यक्ष एल. जी.गायकवाड , माजी सभापती गणेश अधाने, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड , माजी उपसभापती दिनेश अंभोरे, युवराज ठेंगडे, माजी नगरसेवक परसराम बारगळ, योगेश बारगळ, तालुका सरचिटणीस गणेश हजारी, अविनाश कुलकर्णी, शहराध्यक्ष सतिश दांडेकर,राहुल निकुंभ, विकास कापसे, सुखदेव ठेंगडे, विलास काळे, जावेद नहावकर, मुकतार पठाण, अविनाश वेताळ,अशोक गायकवाड, बाबासाहेब औटे, भागचंद जोनवाल , प्रेम जोनवाल, सतिश खंडागळे, द्वारकादास जाधव,नरेंद्र सावळे, सौरभ खंडेलवाल,बबन वर्दे,अनिल करपे,किरण बोडखे, आजिनाथ जाधव, सुरेश जाधव,आशोक तुपे, शंकर अंभोरे, काशिनाथ तुपे, मोहन तुपे, लक्ष्मण थोरात, हरिभाऊ म्हसकर, तसेच तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधीं, पदाधिकारी,सर्व आघाड्याचे/ सेलचे अध्यक्ष, तालुका सरचिटणीस, शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख. सर्व अल्पविस्तारक उपस्थित होते, आभार सतिश दांडेकर शहराध्यक्ष यानी मानले.

# माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन




आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे अभिवादन करण्यात आले यावेळी उपसरपंच कडू भाऊ कीर्तीकर व कृष्णा भाऊ मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले

यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रवीण भाऊ बर्डे मनेश भाऊ गाजरे धम्मपाल भाऊ गायकवाड ग्रामपंचायत सदस्या ज्योतीताई मुळे पोलीस पाटील प्रमोद साठे अंगणवाडी पर्यवेक्षिका काथार मॅडम शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे ग्रामस्थ सोमनाथ भगत नामदेव धनायत संतोष बर्डे रावसाहेब गाजरे कारभारी फटांगडे अंगणवाडी ताई आशाताई आदी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# वडोद बाजार येथील देशी दारूची विक्री बंद करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

वडोद बाजार येथे सुरू असलेली अवैध देशी दारूची विक्री बंद करण्याची मागणी निवेदनाद्वारे राज्य उत्पादन शुल्क विभाग छत्रपती संभाजी नगर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे वडोद बाजार येथे होणारी अवैध देशी दारूची विक्री बंद करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तालुका अध्यक्ष रमेश धनके यांनी निवेदनाद्वारे केली आहे ड्राय डेच्या दिवशी व दररोज पहाटे पाच वाजेपासून ते सकाळी नऊ वाजेपर्यंत देशी दारूची विक्री सर्रासपणे बिनधास्त केले जात असल्यामुळे यावेद्य दारूच्या विक्री कडे पोलीस दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरिकांत व्यसनाचे प्रमाण वाढत आहे काही बोगस पत्रकार देशी दारूचा व्यवसाय करत असल्याने त्यांना परवानगीच मिळाली आहे की काय असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. वडोद बाजार येथील काही पत्रकार अवैध्य व्यवसाय करीत असल्यामुळे या बोगस पत्रकारांना अवैध व्यवसाय करण्याची परवानगी तर मिळाली नाही असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. त्यामुळे प्रामाणिक पणे पत्रकारिता या बोगस पत्रकारांमुळे त्रास सहन करावा लागत आहे बोगस पत्रकारांमुळे चांगले काम करणाऱ्या पत्रकारांची ही बदनामी होत आहे. काही नागरिक पत्रकारितेच्या नावाखाली अवैध व्यवसाय करत असल्यामुळे पोलीस त्यांच्यावर कारवाई होताना दिसत नाही . एकीकडे ड्राय डे जाहीर करत असताना दारूबंदीच्या दिवशी सुद्धा परिसरात दारूची जोरात विक्री केली जाते. विविध सणाच्या दिवशी दारू विक्री बंद असतानाही सर्रासपणे दारूची विक्री केली जाते मात्र पोलीस प्रशासन यावर कोणतेही कारवाई अद्याप झालेली नाही यावेद्य देशी दारूच्या विक्रीमुळे काही नागरिक मध्ये धुंद असल्यामुळे सार्वजनिक कार्यक्रमात मिरवणुकीत आधी ठिकाणी वाद होतात यामुळे अशा अवैद्य देशी दारू विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष रमेश धनके यांनी निवेदनाद्वारे केली आहे. अवैध देशी दारूच्या व्यवसायिकांवर कारवाई करण्यात यावी असे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे





फुलंब्री येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाराष्ट्र विधानसभेचे मा.अध्यक्ष तथा आमदार मा.ना.श्री. हरिभाऊ बागडे नाना व प्रथम नगराध्यक्ष सुहास शिरसाठ राजू प्रधान सुरेश प्रधान शिवाजी पात्रीकर योगेश मिसाळ राम बनसोड वाल्मीक जाधव जी.पी. शेजवळ देविदास ढगारे मनोज चिकटे रवींद्र काथार मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य सहकारी दुध संघ, मुंबई, महानंद तज्ञ संचालकपदी आमदार श्री. हरिभाऊजी बागडेनाना यांची निवड



## फुलंब्री तालुक्याच्यावतीने सत्कार

याप्रसंगी फुलंब्री भाजपा तालुका अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाट, जि.पा सदस्या अनुराधाताई चव्हाण, शिवाजी महाराज पाथ्रीकर, जितेंद्र बाबा जयस्वाल, सर्जेराव मेटे, फुलंब्री भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड, सविताताई फुके, ऐश्वर्याताई गाडेकर, सरचिटणीस गोपाल वाघ, सुचित बोरसे, सांडू अण्णा जाधव, नाथा आप्पा काकडे, रोशन आवसरमल, आप्पाराव काकडे, राजू तुपे, रामेश्वर चोपडे, जगन दाढे, बाळासाहेब तांदळे, कृष्णा गावंडे, नरेंद्र देशमुख, बाळासाहेब सोटम, मयूर कोलते, सुनील तायडे, फारुख शेख, आबासाहेब फुके, प्रभाकर सोटम, रत्नाकर मस्के, विलास उबाळे, गोपीनाथ खिल्लारे, संतोष तांदळे, कडूबा मस्के, सचिन तायडे, राजू टकले, कैलास गायके व तालुक्यातील प्रमुख नेते मंडळी उपस्थित होते.

# सुंदर माझे कार्यालय फक्त नावालाच...!

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

**धाराशिव :** जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा जास्तीत जास्त वेळ हा कार्यालयात जातो. त्यामुळे कार्यालयातील वातावरण स्वच्छ,सुंदर आणि पोषक असल्यास कर्मचाऱ्यांची कार्यालयीन कामकाज करण्याची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. याचाच फायदा सर्वसामान्य जनतेला होत असतो.

यासाठीच शासनाची सर्व कार्यालय स्वच्छ सुंदर असावेत यासाठी "सुंदर माझे कार्यालय" ,अभियान राबविण्यात आले आहे. हे अभियान दरवर्षी 1जानेवारी ते 31 मार्च, 1 मे ते 31 जुलै, 1सप्टेंबर ते 30 नोव्हेंबर या तीन टप्प्यात राबविण्यात येते. अभिनयाचा पहिला टप्पा संपल्यानंतरच एप्रिल महिन्यातच आढावा आणि पुढील टप्प्याचे नियोजन केले जावे अशी शासनाचे धोरण आहे. मात्र वाशी तालुक्यामधील जिल्हा परिषद अंतर्गत सर्वसामान्यांसाठी असणारे मिनी मंत्रालय म्हणजे पंचायत समिती कार्यालय परिसरात सभापती,उपसभापती कक्ष,सभागृह तसेच कार्यालय आहेत. या परिसरात "सुंदर माझे कार्यालय"या अभियानांतर्गत तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांकडून पंचायत समिती कार्यालय परिसरातील भिंती रंग देऊन सजवण्यात आल्या होत्या,तसेच कार्यालय आवारात कुंड्यांमध्ये विविध रंगांची झाडे लावून कार्यालयात सुंदर असे सुशोभीकरण करण्यात आले होते. मात्र फक्त नावालाच असणारे सध्याचे गटविकास अधिकारी यांच्या दुर्लक्षितपणामुळे पंचायत समिती कार्यालय परिसरात अनेक कुंड्यातील झाडे जळून खाक झाले आहेत, तर अनेक कुंड्या मधील झाडे शेवटच्या घटका मोजत आहेत. गटविकास अधिकारी यांच्या कार्यालय बाहेरील कुंड्यांना कर्मचाऱ्यांकडून झाडांना चक्क पाणी देण्याऐवजी गुटखा खाऊन पिचकारी चा अभिषेक घातला आहे. ही खूपच मोठी शोकांतिका आहे. आणि कुंड्यांतील सुकलेल्या शोभिवंत झाडांना खत मात्र म्हणून गुटख्याच्या रिकाम्या पुड्या कुंडीतील बुडाशी ठेवून या झाडांची क्रूर थट्टा करण्यात आलेली आहे. तर गुटखा खाऊन







थुकलेल्या मूळे कार्यालयातील रंगरंगोटी केलेल्या भिंती विद्रुप दिसू लागल्या आहेत. त्यामुळे वाशी येथे मुख्यालय न राहणारे, हजेरी लावण्यापुरतेच कार्यालयात दिसणारे गट विकास अधिकारी यांचा धाकच उरला नसल्याचे सामान्य जनेतूनमधून बोललं जात आहे. कार्यालयातील परिसर लवकरात लवकर स्वच्छ करुन घेण्यात यावा अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल-अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, विलास जाधव,धाराशिव.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'मॅस्ट्रो 2023' स्पर्धा संपन्न

## विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह; विजेत्यांचा रोख बक्षीस, सन्मानचिन्हे केला गौरव

आधुनिक केसरी न्यूज

लातूर : दयानंद वाणिज्य महाविद्यालया अंतर्गत बीबीए विभाग, वाणिज्य मंडळ तसेच शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 5 व 6 एप्रिल 2023 रोजी 'मॅस्ट्रो' या पोस्टर पीपीटी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसीय स्पर्धेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विजेत्या टीमचा रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



स्पर्धेच्या प्रथम सत्रामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन घेण्यात आले व व्दितीय सत्रामध्ये निवडक विद्यार्थ्यांनी PPT प्रेझेन्टेशन दिले. सदरील स्पर्धेत कॉमर्स विषयाअंतर्गत प्रथम पारितोषिक महाजन प्रणव व वाघमारे निकिता; व्दितीय पारितोषिक मालू वेदांत व वलानी माहीर व तृतीय पारितोषिक व्यास दृष्टी ह्या संघांनी पटकावले. तसेच व्यवस्थापन विषया अंतर्गत प्रथम पारितोषिक सगर नागनाथ, द्वितीय पारितोषिक गुलशन कुमार व पांचाळ अरुणा; तृतीय पारितोषिक पंडित पवन व चांडक श्रीनिवास ह्यांनी पटकावले व माहिती तंत्रज्ञान विषया अंतर्गत प्रथम पारितोषिक शेवाळकर वैष्णवी, पाटील सुचिता; द्वितीय पारितोषिक शिंदे पायल व ढगे दीक्षा; तृतीय पारितोषिक कुलकर्णी साक्षी व कुलकर्णी अंकिता या संघांनी पटकावले. तसेच उत्कृष्ट पोस्टर पारितोषिक शेख सालिहा, मंडाले प्रतीक्षा; घुटे निकिता व गव्हाणे आकांक्षा तसेच उत्कृष्ट PPT पारितोषिक सगर नागनाथ व सोनी स्नेहल ह्या संघांनी पटकावले.

स्पर्धेच्या समारोप कार्यक्रमामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड उपस्थित होते. तसेच संगणक विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए समन्वयिका डॉ. वैशाली सातपुते, वाणिज्य मंडळ प्रमुख प्रा. निकिता अग्रवाल व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वैशाली सातपुते यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. आकांक्षा दरगड यांनी केले. बक्षीसाचे वाचन प्रा. प्रेमसागर मुंदडा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कल्याणी पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दीपिका मुंदडा यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संगणक विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ.वैशाली सातपुते, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा.कल्याणी पाटील, प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा. आकांक्षा दरगड, प्रा.दीपिका मुंदडा, प्रा. अनुजा कांबळे, प्रा. शैलजा चिकटे, प्रा. राम पांचाळ, प्रा. दगडू शेख, प्रा. कल्याणी औसेकर, प्रा. लहू शेंडगे,प्रा. प्रसाद पाटील, प्रा. सुनीता इंगळे या प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पंचायत समिती सभागृहात बँक अधिकाऱ्यांची बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** परिपूर्ण प्रस्ताव सादर करूनही कर्ज न मिळालेल्या रत्नपुर-खुलताबाद तालुक्यातील नागरिकांसाठी बैठकीचे आयोजन आमदार प्रशांतजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात मंगळवार रोजो दुपारी 4 वाजता बैठक घेण्यात आली.
खुलताबाद तालुक्यातील ज्या शेतकरी नवयुवक उद्योजक नागरिकांनी पीक कर्ज ,मुद्रा लोन ,तसेच विविध शासकीय योजनेतून शासन पुरस्कृत योजनेतून बँक परिपूर्ण कर्ज प्रस्ताव दाखल केलेले आहे तरीही कर्ज मंजूर न झालेले त्या दृष्टिकोनातून तालुक्यातील सर्व बँक शाखा अधिकारी व वरिष्ठ



अधिकारी यांच्या समवेत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे, या बैठकीत तालुक्यातील अनेक नागरिकानी पीककर्ज मिळत नाही, मुद्रा लोन मिळत नाही , बँकेत वारंवार चक्रा माराव्या लागतात, अण्णासाहेब अर्थिक विकास महामंडळ योजनेंतर्गत फाईल मंजूर होत नाही अशा अनेक तक्रारी आमदार बंब साहेब याच्याकडे मांडल्या याबाबत बोलताना आमदार बंब म्हणाले की, शेतकऱ्याचा छळ घेऊ नका , बॅंक ही शेतकऱ्यांसाठी कर्ज पुरवठा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने निर्माण केल्या आहेत , शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा करावा, केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी दिलेले कर्ज पुरवठाचे टार्गेट पुर्ण करावेत, अशा सुचना यावेळी उपस्थित बॅक मॅनेजर याना दिल्या , या बैठकीस उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते , तहसीलदार सुरेंद्र देशमुख, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, विकास कापसे,आशिष कुलकर्णी, सतिश दांडेकर, संदिप निकम,राहुल निकुंभ, द्वारकादास जाधव, संजय राजपूत,रावसाहेब देशमुख,अनिल करपे, किरण बोडखे,अमोल गवळी,तुकाराम मालोदे, रंगनाथ काळे , आशोक पाराशर, सोमिनाथ तुरेवाले, भागिनाथ जाधव, संजय करपे,सांडु पाटील जाधव,संतोष घुसिंगे, तसेच तालुक्यातील सर्व गावातील नागरिक उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

पर्सनल लोन केल्या जाईल
पगार कमीतकमी 12 हजार /-
तत्काळ मंजूरी
सतीश मगरे
9146774465




# शंकरराव भेलके महाविद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण

## समारंभ तसेच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या, नसरापूर येथील शंकरराव भेलके महाविद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण समारंभ तसेच वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या समारंभास चंद्रकांत पांगारे ( आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक), मा. संदीप उबाळे ( प्रसिद्ध पार्श्वगायक) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मा. एल.एम. पवारसाहेब ( उप सचिव, पु.जि.शिक्षण मंडळ पुणे) उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार शितोळे सर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. माऊली कोंडे सर व प्रा. पोर्णिमा कारळे यांनी करुन दिली. महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे वाचन प्राचार्य डॉ तुषार शितोळे यांनी केले.

यानंतर वर्षभरात विविध शिष्यवृत्ती, शैक्षणिक, विविध स्पर्धा परीक्षा, क्रीडा इत्यादी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील प्रशासकीय सेवक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या प्रा. चंद्रकांत पांगारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की " वेळेचा सदुपयोग करून भविष्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मानवी जीवनात सर्वात मोठी संपत्ती म्हणजे आरोग्य आहे आणि म्हणूनच विद्यार्थ्यांनी शारिरीक शिक्षण, मैदानी खेळ खेळले पाहिजेत. खेळाबरोबरच अभ्यासात सातत्य आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे. " विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर भविष्य घडविण्यासाठी करावा. जीवनात एक ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे मत पार्श्व गायक संदीप उबाळे यांनी व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. एल.एम. पवारसाहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कानमंत्र दिला " तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार" . त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी चांगली संगत देखिल तेवढीच आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार शितोळे यांचे विशेष सहकार्य लाभले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संदीप लांडगे शारिरीक शिक्षण संचालिका प्रा. पोर्णिमा कारळे डॉ. हिमालया सकट, डॉ. जगदीश शेवते, डॉ. आर जी सरोदे, प्रा. सहदेव रोडे, ग्रंथपाल प्रा.भगवान गावित, प्रा डॉ सचिन घाडगे प्रा. जाधवर डी एस, प्रा. माऊली कोंडे, प्रा. महेश कोळपे, प्रा प्राजक्ता कापरे, प्रा. ऋतुजा साळुंखे, प्रा. सीमा कांबळे , संपूर्ण शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान लाभले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. संदीप लांडगे यानी केले तर आभार डॉ. हिमालया सकट यांनी मानले.



# वीजग्राहकांना उत्कृष्ट सेवेसह महसूलवाढीला प्राधान्य द्या : मुख्य अभियंता सचिन तालेवार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवेसह महसूलवाढ व वसुली कार्यक्षमता वाढवण्यास सर्वोच्च प्राधान्य द्या, असे निर्देश मुख्य अभियंता सचिन तालेवार यांनी सोमवारी (10 एप्रिल) अभियंता व अधिकाऱ्यांना दिले. मौलाना आझाद संशोधन केंद्रात आयोजित वार्षिक आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीत परिमंडलातील उत्कृष्ट ग्राहकसेवा, महसूलवाढ व वसुली कार्यक्षमतेत गेल्या वर्षभरात सातत्याने सांघिकपणे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंडल, विभाग, उपविभाग व शाखा कार्यालयांतील अभियंता व अधिकाऱ्यांना मुख्य अभियंता सचिन तालेवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मंचावर अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे (शहर मंडल), प्रवीण दरोली (ग्रामीण मंडल) व संजय सरग (जालना मंडल) यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता तालेवार म्हणाले, की यंदाच्या आर्थिक वर्षात छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजहानी कमी करण्यासोबतच वीजबिलांमधून परिमंडल थकबाकीमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्यात अचूक बिलिंग, थकीत वीजबिलांची वसुली, महसूलवाढीच्या विविध उपाययोजना, वीजचोरीविरुद्ध कठोर कारवाई आणि तत्पर ग्राहकसेवा या बाबींकडे सर्वांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.



**महावितरण अभियंते व अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता सचिन तालेवार. मंचावर अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे, प्रवीण दरोली, संजय सरग.**

छत्रपती संभाजीनगर परिमंडल अंतर्गत गेल्या आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक उपविभागातून एक शाखा, प्रत्येक विभागातून एक उपविभाग, प्रत्येक मंडलातून एक विभाग तसेच परिमंडलातून एका मंडलाचा प्रातिनिधीक गौरव मुख्य अभियंता तालेवार यांच्या हस्ते करण्यात आला. महेश सोनार (पॉवर हाऊस), दादासाहेब काळे (रेल्वे स्टेशन एमआयडीसी), इशान उबाळे (सिटी चौक), विक्रांत खाडे (बजाजनगर), राजेश गिरी (सिडको एन-9), शरद ढाकणे (विमानतळ), विनोद शेवणकर (गारखेडा), सुशील देवकर (मोंढा), सचिन उकांडे (ग्रामीण), मनीष मगर (शेंद्रा एमआयडीसी), सचिन सोमवंशी (दावरवाडी), रवींद्र कापगते (सिल्लेगाव), प्रदीप काळे (बाजारसावंगी), अमोल घोडके (वारेगाव), मिथुन पवार (चापानेर), अविनाश धाकपडे (करंजखेड), नितीन कुलकर्णी (महालगाव), अभिजीत पाटील (गारज), अविनाश कुंदे (बनोटी), मनोज सोन्ने (आमठाणा), भीमराव कडेल (गोळेगाव), कृष्णा कुलकर्णी (बदनापूर), प्रमोद दारकोंडे (भोकरदन), प्रशांत गित्ते (माहोरा), सचिन गुल्हाने (जालना शहर-4), प्रकाश चव्हाण (जालना ग्रामीण-3), समीर धोपेकर (अंबड), व्यंकटेश परसे (तीर्थपुरी), प्रवीण गणेर (वाटूर), विकास दरेकर (परतूर) या शाखा अभियंत्यांना तसेच शंकर चिंचाणे (पॉवर हाऊस), अतुल देवकर (क्रांती चौक), प्रशांत तोडकर (ग्रामीण-1), उस्मान खान (खुलताबाद), सचिन परदेशी (पिशोर), स्वाती ढगे (सिल्लोड-2), सुधीरकुमार वानखेडे (जालना शहर) व नीलेश बेंडाळे (परतूर) या उपविभागीय अभियंत्यांना गौरवण्यात आले. याबरोबरच कार्यकारी अभियंता महेश पाटील (शहर-2 विभाग), विश्वनाथ लहाने ( कन्नड विभाग) व दीपक सोनोने (जालना-1 विभाग) व अधीक्षक अभियंता प्रकाश जमधडे (शहर मंडल) यांचाही उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रेमसिंग राजपूत, विष्णू ढाकणे, भूषण पहूरकर, सुरेश जाधव, सोमनाथ मठपती, जयंत खिरकर, प्रभारी वरिष्ठ व्यवस्थापक नितीन पाडसवान, व्यवस्थापक विजय पचारे, सखाराम जरारे, सुनील मगरे यांच्यासह अभियंते व अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर आर्दड यांनी केले व आभार उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी मानले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार
किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# 'बापापरी बाप गेला अन बोंबलतांना हातही गेला' द्राक्षे उत्पादकांची अवस्था

आधुनिक केसरी न्यूज





**निफाड :** सध्या द्राक्षे पिकास अत्यल्प भाव मिळत असून व्यापारी फिरकेनासे झाले आहेत. त्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे द्राक्षे उत्पादकांची सध्याची अवस्था, ' बापापरी बाप गेला अन बोंबलतांना हातही गेला' अशी झाली आहे.

नाशिक जिल्हा हा द्राक्षे उत्पादनासाठी जगात प्रसिद्ध आहे. परदेशात द्राक्षे पिकाच्या निर्यातीच्या माध्यमातून करोडो रुपयांचे परकीय चलन भारताला प्राप्त होत असते. मात्र कोविड काळापासून द्राक्षे पिकाची अवस्था दयनीय झाली आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणावर द्राक्षे निर्यात होईल असे वाटत असतांना जानेवारी, मार्च व एप्रिल महिन्यात गारपीट व अवकाळी पावसाने द्राक्षे पिकाचे अतोनात नुकसान केले. त्यामुळे निर्यात मोठ्या प्रमाणावर थांबली आहे. परिणामी स्थानिक बाजारात जास्त प्रमाणात द्राक्षे उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे सध्या द्राक्षे पिकाचे भाव प्रति किलो १२ ते १८ रुपयांपर्यंत येऊन ठेपले आहेत. परिणामी द्राक्षे व्यापारी देखील फिरकेनासे झाले आहेत. त्यामुळे द्राक्षे उत्पादक हवालदिल झाले आहेत. एरवी चार साडेचार महिन्यात काढणीला येणारे पीक सहा महिने उलटले तरी अजून झाडावर आहेत. त्यामुळे याचा पुढील वर्षी उत्पन्नावर मोठा परिणाम होणार आहे. प्रतिकूल वातावरण, एकरी होणारा उत्पादन खर्च मागील २० वर्षात चारपट वाढला आहे त्या तुलनेत द्राक्षाचे भाव (देशांतर्गत) दुप्पट सुद्धा झाले नाही. त्यामुळे द्राक्षे उत्पादकांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

**वट राजाची वागणूक कैकाड्याची**

द्राक्षे उत्पादक हुशार आहे, अभ्यासु आहे, ज्ञानी हे, खर्चाची ऐपत आहे, रिस्क घेण्यात अग्रेसर आहे वैगरे अशा वेगळ्याच दृष्टीने बघितले जाते. द्राक्षे उत्पादन करणारे नाशिक, सांगली जिल्हे म्हणजे जणू कुबेर नगरी. पण मागील काही वर्षात हा समज शुद्ध गैरसमज झाला असून द्राक्षे बागायतदार हा शब्द शाप ठरत आहे. सरकारी धोरणापुढे आधीच झालेली हतबलता, निसर्गाचा प्रकोप, वाढलेली महागाई ह्या तिहेरी संकटापुढे उत्पादक अक्षरशः मोडून पडला आहे. जवळपास सर्वच द्राक्षे उत्पादकांना वर्षभर केलेल्या खर्चाइतपत पैसे हातात आले नाही. त्यामुळे औषधे, रासायनिक खते यांची उधारी कशी फेडायची हा प्रश्न निर्माण झाला आहे. द्राक्षे पिकाच्या भरवशावर केलेली जीवनावश्यक वस्तूची उधारी कशी भरायची? मुलांची शैक्षणिक फी, लग्न कार्ये, पुढील हंगामासाठीची तयारी कशी करणार? असे एक ना अनेक प्रश्न द्राक्षे उत्पादकांपुढे उभे आहे.

**जिल्हा बँकेकडून कर्जवसुली थांबविण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून जाचक वसुली सुरू आहे . मात्र अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीच्या पाहणीच्या पार्श्वभूमीवर ही जाचक वसुली थांबवावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री मा .एकनाथ शिंदे यांच्याकडे शेतकऱ्यांच्या वतीने साकडे घालण्यात आले असता त्यांनी कर्जवसुली थांबविण्यात येईल असे आश्वासन दिले आहे .

नाशिक जिल्ह्यात बऱ्याच भागात गेल्या आठ दिवसापासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्ष, कांदा, गहू या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे . पिक उभे करण्यासाठी केलेला खर्च देखील पदरात पडणे मुश्किल आहे . अशा परिस्थितीत ना .जि .म .स . बँक ही शेतकऱ्यांकडून जुलमी व सक्तीची वसुली करत आहे . शेतकऱ्यांच्या ७/१२ वर बँकेचे नाव दाखल करून १००/८५ च्या अपसेट प्राईजच्या नोटीसा अतिशय घाई घाईने देण्यात येऊन, शेतकऱ्यांचे नावे ही वृत्तपत्रात प्रकाशित करत मानहानी करून जमिनीचे लिलाव करीत आहे . तरी सदर प्रकार त्वरीत थांबवण्याचे आदेश जिल्हा बँकेला द्यावे व राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे एकरकमी कर्जफेड योजना लागू करून व्याज माफ करावे अशी विनंती करण्यात आली . नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये देखील साडेसहा हजार शेतकऱ्यांच्या जमिनीची लिलाव प्रक्रिया सुरू केली होती . सदर प्रश्न मा .आमदार अनिल देशमुख यांनी विधानसभेमध्ये उपस्थित केला होता त्या प्रश्नास उत्तर देताना मा .उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना असे अपमानित करता येणार नाही त्यांनी तात्काळ बँकेना आदेश देण्यात येतील अशी घोषणा विधानसभेमध्ये केली व जमिनीचे लिलाव प्रक्रिया ताबडतोब थांबविण्यात येईल असे आश्वासन दिले . मात्र तरीही जिल्हा बँकेची जाचक वसुली सुरू असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत . त्यामुळे मुख्यमंत्री मा .एकनाथ शिंदे यांनीच या प्रकरणाकडे गांभीर्याने बघावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली

